| लातूर | वर्ष ३४ वे | अंक २९३ वा | शनिवार, दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.
RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR
(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
Email-dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## मेट्रोचा स्लॅब कोसळला

### मुलुंडच्या एलबीएस रोडवर भीषण अपघात, ऑटो अन् कारचा चेंदामेंदा, एकाचा मृत्यू, काही जण जखमी

***मुंबई/प्रतिनिधी:** मुंबईतील मुलुंड (पश्चिम) परिसरात शनिवारी दुपारी मेट्रो बांधकामादरम्यान गंभीर अपघात घडला. एलबीएस रोड वरील बांधकाम सुरू असलेल्या मेट्रो पिलरचा सिमेंटचा एक भाग अचानक तुटून खाली पडला. हा तुकडा रस्त्यावरून जात असलेल्या ऑटो रिक्षा आणि एका कारवर कोसळला. ही घटना जॉन्सन अँड जॉन्सन कंपनीजवळ घडली. प्राथमिक माहितीनुसार, दुपारी सुमारे १२.२० वाजता या अपघाताची माहिती संबंधित यंत्रणांना मिळाली. या दुर्घटनेत ऑटोमध्ये प्रवास करणाऱ्या तीन ते चार जण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. तर मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार एकाचा मृत्यू झाला आहे. महापौर रितू तावडे मुलुंड घटनास्थळी पोहोचल्या आहेत.*





या घटनेत जखमी झालेल्या एका व्यक्तीचा मृत्यू झालेलाल आहे, मात्र त्या मृत व्यक्तीबाबत कोणतीही इतर माहिती समोर आलेली नाही. या ठिकाणी काम सुरू असताना तेथे बॅरीकेट लावलेले नव्हते, किंवा कोणत्याही इतर उपाययोजना करण्यात आलेल्या नव्हत्या, वाहतूक कोंडी होते म्हणून परिसरातील बॅरीकेट हटवण्यात आले होते, त्यानंतर आज ही अपघाताची दुर्दैवी घटना घडली आहे. त्या परिसरात काम सुरू असतानाच तेथे कोणत्याही उपाययोजना करण्यात आलेल्या नव्हत्या, काम सुरू असताना स्लँब कोसळून ही घटना घडली आहे, यामध्ये चार जण जखमी झाल्याची माहिती समोर आली होती, त्यानंतर आता एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

घटनेची माहिती मिळताच मुंबई अग्निशमन दल, स्थानिक पोलीस, मेट्रो प्राधिकरणाचे कर्मचारी, संबंधित विभागाचे कर्मचारी तसेच १०८ रुग्णवाहिका सेवा तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जखमींना त्वरित उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले असून बचावकार्य तत्काळ सुरू करण्यात आले. पोलीसांनी परिसर ताब्यात घेत वाहतूक वळवली आणि रस्त्यावर पडलेला मलबा हटवण्याचे काम हाती घेतले. दरम्यान, हा अपघात नेमका कशामुळे झाला याचा तपास सुरू असून बांधकामादरम्यान सुरक्षेच्या नियमांचे पालन करण्यात आले होते का, याचीही चौकशी केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार मुलुंड येथील लाल बहादूर शास्त्री मार्गावर गेल्या अनेक महिन्यांपासून मेट्रो मार्गिकेचे काम सुरु आहे. त्यासाठी याठिकाणी दररोज भलेमोठे गर्डर आणि स्लॅब वरती चढवण्याचे काम सुरु असते. आज शनिवारी मेट्रोचा एक स्लॅब खाली कोसळला. त्यावेळी खालच्या एलबीएस रोडवरुन वाहने ये-जा करत होती. हा स्लॅब एका ऑटो रिक्षावर आणि कारवर कोसळला आहे. स्लॅबच्या खाली आलेल्या वाहनांच्या भागाचा चेंदामेंदा झाला आहे. हा स्लॅब कोसळला तेव्हा रिक्षातून तीन जण आणि ड्रायव्हर प्रवास करत होते. हे चार जण अपघातामध्ये जखमी झाल्याची माहिती आहे. जखमींना नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. स्लॅबच्या खाली दबून वाहनांचा झालेला चेंदामेंदा बघता जखमींपैकी काहीजण दगावल्याची शक्यता वर्तविली जात आहे.

बीएमसीने या घटनेबाबत माहिती देताना म्हटले आहे की, आज दुपारी १२.२० वाजता मुलुंड (पश्चिम) येथील एलबीएस रोडवरील जॉन्सन अँड जॉन्सन कंपनीजवळ मेट्रोच्या खांबाचा काही भाग कोसळला. बांधकाम सुरू असताना सिमेंट मेट्रोच्या खांबाचा काही भाग कोसळून रिक्षावर पडला. मुंबई अग्निशमन दल, पोलिस, मेट्रो कर्मचारी, वॉर्ड कर्मचारी आणि १०८ रुग्णवाहिका सेवा घटनास्थळी उपस्थित आहेत. ऑटोरिक्षातील ३-४ जण जखमी झाल्याची शक्यता आहे. तपशीलांची प्रतीक्षा आहे.

## मोहन महाराज खंडेलवाल यांच्याकडून महाशिवरात्र निमित्त फराळाचे वाटप



**लातूर/प्रतिनिधी:** येथील संतोषी माता भक्त मोहन महाराज खंडेलवाल यांच्यातर्फे महाशिवरात्रीनिमित्त फराळाचे वाटप करण्यात आले. त्यांनी भगर, शाबुदाणा व शेंगदाने आदिचे मातेच्या भक्तांना वाटप करण्यात आले. महाशिवरात्रीचा उपावसा असल्याने त्यांनी भक्तांना फराळाचे वाटत केले आहे. त्यांची ही सेवाभावी वृत्ती असून ते नवरात्रौ असो किंवा अन्य उपवास असो ते भक्तांना फळालाचे वाटप करीत असतात. त्यांनी पाणी टंचाईच्या काळात पाणी वाटप, लॉकडावुनमध्ये मदत, पोलिसांना पाणी बॉटल वाटप असे विविध सामाजिक उपक्रम राबवित असतात. त्याच प्रमाणे गरजू मुलींचा विवाह आपल्याखर्चाने केला आहे. सतत दानधर्मातून मिळालेल्या आर्थिक मदतीतून सामाजिक मदत करीत असतात. त्यांनी शिवरात्रीनिमित्त फराळाचे वाटत केल्याने अनेक भक्तांनी मोहन महाराज खंडेलवाल यांना अशिर्वाद दिला आहे.

## शरद पवार पुन्हा राज्यसभा लढणार, संजय राऊतांचं मोठं वक्तव्य

**मुंबई/प्रतिनिधी:** महाराष्ट्राच्या राजकारणात दोन्ही राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षांच्या संभाव्य विलिनीकरणाच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. तर दुसरीकडे एप्रिल महिन्यात सात राज्यसभा सदस्यांची मुदत संपत असून, त्यामध्ये ज्येष्ठ नेते शरद पवार यांचाही समावेश आहे. त्यामुळे शरद पवार यांनी पुन्हा एकदा राज्यसभेवर जावे, अशी मागणी केली जात आहे. या संदर्भात शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी माध्यमांशी बोलताना मोठं वक्तव्य केलंय. राज्यसभेच्या जागांबाबत प्रश्न विचारला असता संजय राऊत म्हणाले, एप्रिलमध्ये राज्यसभेच्या काही जागा रिक्त होत आहेत.

## लव्ह जिहादसह, हिंदुत्ववादी भूमिका घेणाऱ्या आमदार संजय केनेकरांच्या कार्यालयात एअरगन

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगरमध्ये आज सकाळी एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला. भाजप आमदार संजय केनेकर यांच्या क्रांती चौकातील मध्यवस्तीत असलेल्या संपर्क कार्यालयात एका बॅगेत पिस्तुलासारखी वस्तू आढळल्याने परिसरात खळबळ उडाली. काल सायंकाळी अज्ञात व्यक्तीने ही बॅग कार्यालयात ठेवून दिल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे. सुरुवातीला कुणाची तरी बॅग विसरली असावी, असा समज करून कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी ती तशीच ठेवली. मात्र सकाळपर्यंत कुणीही त्या बॅगेबाबत संपर्क साधला नाही. त्यामुळे संशय आल्याने बॅग उघडून पाहिली असता त्यामध्ये पिस्तुल आढळल्याचे दिसून आले.

घटनेची माहिती मिळताच आमदार संजय केनेकर यांनी तत्काळ पोलिसांशी संपर्क साधून संपूर्ण प्रकार कळवला. पोलिसांनी तातडीने कार्यालयात धाव घेत बॅग आणि त्यातील वस्तू ताब्यात घेतली. प्राथमिक तपासात संबंधित पिस्तुल ही एअरगन असल्याचे स्पष्ट झाले आहे. तरीदेखील सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांनी या घटनेकडे गांभीर्याने पाहिले आहे. एअरगन कार्यालयात कशी आणि केव्हा आणली गेली, ती कोणाची आहे आणि तिचा उद्देश काय असू शकतो, याचा तपास सुरू करण्यात आला आहे.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत वरिष्ठ अधिकारी पंकज अतुलकर घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आमदार संजय केनेकर यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून संपूर्ण घटनेची माहिती घेतली. कार्यालय परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्याचे काम सुरू झाले आहे. बॅग कार्यालयात नेमक्या कोणत्या वेळी ठेवण्यात आली, ती ठेवणारी व्यक्ती कोण होती आणि ती कोणत्या दिशेने निघून गेली, याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. कार्यालयात ये-जा करणाऱ्या व्यक्तींची नोंद आणि संबंधित कागदपत्रांची छाननी करून पुढील तपासाची दिशा ठरवली जाणार आहे.

## सहकारमहर्षी दिलीपरावजी देशमुख यांचे शुभहस्ते रेणा साखर कारखान्याचे ४,२१,१११ व्या साखर पोत्याचे पुजन

### रेणा कर्मचारी यांना १० टक्के पगारवाढीची घोषणा

**लातूर/प्रतिनिधी:** रेणा सहकारी साखर कारखान्यातील गळीत हंगाम २०२५-२६ मधील उत्पादीत ४,२१,१११ व्या साखर पोत्याचे पुजन कारखान्याचे संस्थापक सहकार महर्षी माजी मंत्री श्री. दिलीपरावजी देशमुख साहेब यांच्या शुभहस्ते व कारखान्याचे चेअरमन अनंतराव ठाकुर देशमुख, व्हा.चेअरमन श्री.ॲड. प्रवीण पाटील व इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आले.

सदर कार्यक्रमामध्ये कारखान्याचे कर्मचारी यांनी ८७ दिवसात उत्तम गाळप केले असल्याने कारखान्यातील कर्मचारी यांना १० % पगार वाढ करत असल्याचे कारखान्याचे संस्थापक सहकारमहर्षी श्री. दिलीपरावजी देशमुख यांनी यावेळी जाहीर केले.





कारखान्याने चालु गळीत हंगामाचे गाळप दि. १८/११/२०२५ रोजी चालु झाले असुन कारखान्याने दि. १२/०२/२०२६ अखेर ८७ दिवसात कार्यक्षमतेचा पुरेपुर वापर करुन ४,०७,७७५ मे.टन गाळप करुन बी हेवी मोलसेस व सिरप इथेनॉलसह सरासरी ११.९३% साखर उताऱ्यासह ४,२१,१११ क्विंटल साखर उत्पादीत केली कारखान्याचे आसवाणी प्रकल्पही सुरु आहे यामध्ये ४९२४५०१ लिटर इथेनॉल उत्पादन व तसेच कारखान्याच्या सहविज निर्मिती प्रकल्पातुन ८४४८००० युनिटचे महावितरणा एक्सपोर्ट झाले असल्याची माहीती कारखान्याचे चेअरमन श्री. अनंतराव ठाकुर देशमुख यांनी दिली.

सदरील कार्यक्रमास लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे व्हा.चेअरमन श्री. प्रमोद जाधव, कारखान्याचे माजी चेअरमन तथा संचालक यशवंतराव पाटील, साखर संघाचे मा.उपाध्यक्ष तथा संचालक आबासाहेब पाटील, धनराज देशमुख, संग्राम माटेकर, तुकाराम कोल्हे, तानाजी कांबळे, शंकरराव पाटील, गोविंद पाटील, रणजित पाटील, बालाजी हाके, श्री व सौ. वैशालीताई पंडीतराव माने, श्री व सौ. आमृताताई स्नेहलराव देशमुख, तज्ञ संचालक चंद्रचुड चव्हाण, नरसिंग इंगळे, कार्यलक्षी संचालक आण्णासाहेब पाटील, कार्यकारी संचालक बी.व्ही.मोरे शेतकरी सभासद व कारखान्यातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात प.पू. गोळवलकर गुरुजींना अभिवादन

**लातूर/प्रतिनिधी:** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक परमपूजनीय श्री गोळवलकर गुरुजी यांच्या तिथीनुसार जयंती निमित्ताने त्यांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाची सुरुवात मंचावरील मान्यवरांच्या हस्ते भारत माता व प. पू. श्री गोळवलकर गुरुजी यांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली. याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्यध्यापक बालासाहेब केंद्रे, प्रमुख पाहुणे विस्तारसेवा कार्य समिती संस्था प्रमुख तथा विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक जितेंद्र जोशी यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे जितेंद्र जोशी यांनी संघाचे द्वितीय सरसंघचालक प.पू . गोळवलकर गुरुजी यांच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला. ज्यांच्या जीवनाचे अंतिम ध्येय मातृभूमीची सेवा हेच होते, ते गुरुजी होय असे सांगितले. संघ व सामाजिक समरसता या विषयाची मांडणी करताना असे म्हणाले, की समाज जीवनात शैक्षणिक क्षेत्र, सामाजिक क्षेत्र, राजकीय क्षेत्र, क्रीडाक्षेत्र, विज्ञान, वनवासी अशा अनेक क्षेत्रांमध्ये संघाचे कार्य सुरू आहे. 'माणसाने माणसाशी माणसासम वागणे' हेच संघाला अभिप्रेत आहे. समरसता ही केवळ जाती व्यवस्थेतील



समरसता नव्हे, तर सर्व क्षेत्रातील समरसता होय. समाजात समभाव व ममभाव ठेवून संघ काम करत आहे, असे याप्रसंगी त्यांनी सांगितले.

याप्रसंगी विद्यालयातील संगीत शिक्षक संतोष बीडकर यांनी प्रेरणा गीत सादर केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन अश्विनी स्वामी यांनी केले तर जान्हवी देशमुख यांच्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. ज्ञानोपासक मंडळांतर्गत संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी, कार्यक्रम प्रमुख ग्रंथपाल अभय गोस्वामी, अमोल गायकवाड तसेच व्यवस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## प्रभात किरणे

विश्व अनंती अनंत,कळे न
अंत अजून लाखोनी लाखो
जीव,त्या कणात कण
कशाला मनी बाळगवी,
अहंकार गर्व कुठे असती
नोंद सोडून गेल्यास सर्व
– इंजि. नागनाथ
कलवले, लातूर

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



ब्लॅक फ्रायडे गुंतवणूकदाराचे
७ लाख कोटी बुडाले...

## चिमटा



दयाचा

लातुरातील रस्ता
दुभाजकामधील झाडे
उन्हामुळे वाळत आहेत !
सामाजिक,परोपकारी संस्थेने
पुढे येण्याची गरज आहे !!




ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## अर्थसंकल्पात जनसामान्य हाच केंद्र बिंदू मानावा

राज्याचा अर्थसंकल्प मांडला जाणार आहे. राज्याच्या अर्थमंत्रालयाने जनसामान्यच हाच केंद्र बिंदू मानला पाहिजे. त्याच प्रमाणे गतवेळी मांडलेल्या अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीचे काय झाले याचा आढावा घेतला पाहिजे. निधीचा वापर झाला का नाही. झाला असेल तर त्याची फलश्रुती किती आहे. जनतेला अर्थिक तरतुद आवडली का? अशा विविध बाबीचा विचार झाला पाहिजे. राज्यात अनेक प्रश्न आहेत. त्यात महत्त्वाची किती आहेत व कोणत्या बाबीला प्राधान्य दिले पाहिजे याचा विचार होणे अपेक्षित आहे. आता पहिल्यांदा विचार केला पाहिजे की, गरीब कोणी नाही. रस्त्यावर मागणाऱ्याची संख्या नगण्य आहे. भिखारी संपल्यात जमा आहेत. यात भिख मागणारे हे गरीब नाहीत तर त्यांचा काहींचा व्यवसाय आहे हे उघड झाले आहे. कोणतेही श्रम न करता अधिक पैसा कमविण्यासाठी भिख मागतात हे अनेकदा दिसून आले आहे. मंदीराच्या समोर अशी मंडळी बसलेली असते किंवा बसविलेली असते. या बाबत कडक धोरणाची गरज आहे. जर तो खरेच गरीब असेल तर ठिक मात्र कोणतेही श्रम न करता कमविण्याचे साधण म्हणून याकडे पाहिले जात असेल तर ते योग्य नाही. त्यामुळे भिखारी आहेत याबाबत लक्ष द्यावे लागेल. त्याच प्रमाणे दुसरे असे की, गरीब कोणाला म्हणावे, गरीब कोणी राहीले नाही. सरकारच्या एवढ्या योजना आहेत की, कोणत्याही परिस्थितीत जगला पाहिजे. सध्याला खाण्याच्या वस्तू महाग नाहीत मात्र चैनीच्या वस्तू परवडणाऱ्या नाहीत. खिशाला झळ बसते ते जीवनशैलीच्या बदलामुळे! मुळात खाण्यासाठी किंवा जीवन जगण्यासाठी फार काही लागते असे नाही. तसे पाहिले तर मानसाला जगण्यासाठी लागते किती? या बाबत प्रत्येकांनी चिंतन केले पाहिजे. मुळात कारण नसताना जी हाव केली जाते ती घातक ठरत आहे. समाधानी कोणीही नाही. मला मिळावे ते ही इतरपेक्षा अधिक मिळाव अशी धारणा आहे. आज शहरातील बार, दारूची दुकाने आदि फुल्ल चालतात. कितीही किंमती वाढविल्यातरी या दुकानासमोरील गर्दी कमी होत नाही हा अनुभव सर्वांनी पाहिला आहे. त्यामुळे राज्यात जो अर्थसंकल्प मांडला जाणार आहे त्यात मध्यम व कनिष्ठ वर्गाकडे लक्ष ठेवून मांडला पाहिजे. दुसरे असे की, दरवेळा तीच तरतुद केली जाते. तोच प्रश्न जर दुसऱ्याही वर्षी असेल तर त्यातील त्रुटी शोधली पाहिजे. एक साधा प्रश्न आहे. पिण्याचे पाणी व रस्ते या बाबत प्रश्न दरवर्षी दिसून येतो. पाण्यासारखा पैसा पाण्याच्या नियोजनासाठी खर्च केला जातो. रस्त्यासाठी मोठा खर्च होतो तरी दरवर्षी तरतुद करावी लागते. हे प्रश्न कायम स्वरूपी सोडविले का जात नाहीत? एकदा खर्च एखाद्या योजनेवर केला तर पाच वर्षांनी खर्च अपेक्षित आहे. असे होत नाही. दरवर्षी खर्च करावा लागतो. अशा योजनेतील त्रुटीचा शोध घेतला पाहिजे. त्याची सोडवणुक केली पाहिजे. ते शक्य आहे. आपल्या देशात गुणवत्ता अधारीत काम होत नाही. याला जबाबदार नागरिक आहेत. नागरिक चांगले काम करून घेत नाहीत तर जनतेनी सरकारपेक्षा जबाबदारीने विकास कामे करून घेतली तर जनतेचा पैसा वाया जाणार नाही. जनतेचा पैसा कोठे वाया जातो हे जनतेला माहिती असते तरी त्याकडे दुर्लक्ष होताना दिसून येते. जनता मुळात विचारी नाही. विचार वर-वर करते, सखोल विचार केला तर सर्वजनच आनंदी राहू शकतात. आर्थिक आडचण भासणार नाही. आर्थिक आडचण कधी भासते तर अनावश्यक खर्च केल्याने, अनावश्यक बाबीत गुंतवणुक केल्याने. दररोज लागते किती किंवा किती खर्च होतो तेवढी तरतुद केलीली असते. मुळात महागाई वाढली तरी पगारी तेवढ्या प्रमाणात वाढल्या आहेत. पुर्वी एका हजारात भागत होते आता दहा हजार लागत असतील तर वीस हजार पगारीची नोकरी आहेच! त्यामुळे महागाई किंवा भागत नाही यापेक्षा नियोजन बिघडले आहे. नियोजनाचा अभाव आहे हे लक्षात घेतले पाहिजे. देशात किंवा राज्यात दरवर्षी तरतुद केली जाते. सदरील तरतुदीचा वापर योग्य होत नसल्याने समस्या कायम आहेत. ही बाब तशी कोणाच्या लक्षात येत नाही असे नाही. सर्वांच्या लक्षात येते मात्र वळत नाही ही मोठी वस्तूस्थिती आहे. अनेक बाबतीत अविचाराने घेतलेले निर्णय आपल्याच पायावर दगड मारून घेतल्यासारखे आहेत. त्यामुळे विचारपुर्वक जनतेनी वागले पाहिजे. राज्याचा अर्थसंकल्प सादर करताना मध्यमवर्गीय हाच केंद्रबिंदू मानला पाहीजे. जनता सुखी व समाधानी असेल तर प्रगती साधता येते. मुळात बऱ्याचवेळा नियोजनाचा अभाव दिसून येतो. काटकसर ही सर्वात महत्त्वाची बाब आहे. याकडे कोणाचेही लक्ष नाही. शासकिय गाड्या ज्या चार चाकी आहेत त्याचा वापर अनावश्यक होत आहे. कार्यालयात वीज, पंखे, संगणक गरज नसताना चालू आहेत. ज्या मुलभूत बाबी आहेत त्याचा अनाश्यक वापर कमी झाला पाहिजे. जर राज्य सरकारने सक्तीने काटकसरीचे धोरण राबविले तर मोठी बचत होवू शकते. वेळीच लक्ष दिले जात नाही. कडक कारवाई केली जात नाही. धोरणात लवचिकता दिसून येते. त्यामुळे राज्याचा मांडला जाणार अर्थसंकल्प हा वेगळा असला पाहिजे. यापुर्वी पेक्षा काही तरी नाविण्य असले पाहिजे. दरवर्षी मांडण्याची तशी गरज आहे का? कारण तीच तरतुद व त्याच कामासाठी होत असेल. त्याच त्या समस्या सोडविण्यासाठीची तरतुद करावी लागत असेल तर दरवर्षी दिलेल्या निधीचे काय झाले किंवा योग्य विनियोग झाला का नाही याचा विचार गंभीरतेने केला पाहिजे. मुळात आपल्या राज्यात फार अशा समस्या नाहीत. ठराविकाची सोडवणुक प्राधन्याने केली पाहिजे. कारण नसताना आर्थिक बाब वाया जात असेल तर ते योग्य नाही. जनतेच्या पैसातून खर्च होतो. एकीकडे कर रूपाने वसुल म्हणजे महसुली उत्पन्न वाढविले जाते तर दुसऱ्या बाजून खर्च केला जातो. खर्च अधिक व उत्पन्न कमी होत असेल तेही अर्थकारणात चालत नाही. त्यामुळे राज्य सरकारने जनसामान्य हाच केंद्र बिंदु मानून अर्थसंकल्प मांडला पाहिजे. जो दिलासादायक असेल. त्यामुळे राज्य सरकारने विचारपूर्वक, सर्वमान्य असा अर्थसंकल्प मांडावा. तो राज्यातील बॅकलॉक भरून काढेल. समस्याचे निरसण होवू शकेल. समस्या सुटण्यत मदत होईल असा अर्थसंकल्प सादर होणे अपेक्षित आहे.

# पंचपरिवर्तनाच्या माध्यमातून वैभवशाली समाज घडवायचा आहे : प्राचार्य पांडे

**लातूर/प्रतिनिधी :** आजघडीला कुटुंबाची अवस्था अस्वस्थ मन आणि उध्वस्त अंगण अशी झाली आहे. कर्तव्याचे पालन करणारी कुटुंब व्यवस्था खूप महत्वाची आहे. त्याकरिता कुटुंब प्रबोधनही महत्वाचे असून पंचपरिवर्तनाच्या माध्यमातून वैभवशाली समाज घडवणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन परभणीच्या मराठवाडा कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य अनंतराव पांडे यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे व नवनिर्माण प्रतिष्ठान, लातूरच्या संयुक्त विद्यमाने लातुरात आयोजित करण्यात आलेल्या नवनिर्माण व्याख्यानमाला – २०२६ चे द्वितीय पुष्प गुरुवारी सायंकाळी प्राचार्य पांडे यांनी पंचपरिवर्तनातून सामर्थ्यशाली समाज व वैभवशाली राष्ट्रनिर्मिती या विषयावर गुंफले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून अष्टांग योग केंद्राचे संचालक योगाचार्य दिलीपराव भातलवंडे उपस्थित होते. मंचावर नवनिर्माण प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख, कार्यवाह अशोक शिवणे , उमेश कुलकर्णी आदी मान्यवरांची उपस्थिती होती. बदलत्या काळात मोबाईल ही अत्यावश्यक वस्तू बनली असली तरी किमान काही काळासाठी तरी प्रत्येकाने आपल्यापासून मोबाईल दूर ठेवण्याचा प्रयत्न करावा. किमान रात्रीचे जेवण कुटुंबातील सर्व सदस्यांनी एकत्रित मिळून करावे. आजमितीस घरातही मोबाईल पार्किंग स्टेशन असणे आवश्यक आहे. म्हणजे जेवताना सगळ्यांचे फोन तेथे ठेवता येईल. कुटुंब प्रबोधनासाठी हे अतिशय आवश्यक असल्याचे प्राचार्य अनंतराव पांडे यांनी सांगितले.

आपल्या व्याख्यानात प्राचार्य पांडे यांनी पंचपरिवर्तनाच्या माध्यमातून विचारांचे जागरण केले जाणार आहे. निसर्गाचे बिघडलेले चक्र पर्यावरण संवर्धन करून व्यवस्थित करायचे आहे. विषयुक्त अन्न निर्माण न करता, विषमुक्त अन्न निर्माण करायचे आहे.गुणी समाज निर्माण करण्यासाठी स्वबोध स्पष्ट असावा यात स्वभाषा, स्वभोजन, स्वभवन, स्वगृह, स्वभ्रमण हे स्वदेशी विचाराच्या माध्यमातून करायचे आहे.संतांनी शिकवलेली सामाजिक समरसता आपल्या विचारातून, प्रत्यक्ष कृतीत उतरवायची आहे.पंचपरिवर्तनाच्या माध्यमातून चरित्र, चारित्र्य निर्माण करून बलशाली, वैभवशाली राष्ट्र घडवण्याचे स्वप्न पूर्ण करायचे आहे,अशा अनेक महत्वपूर्ण बाबी विशद केल्या. सद्यस्थितीत जगातले १८ टक्के लोक कोणत्या ना कोणत्या कर्करोगाने बाधित झालेले पाहायला मिळतात. हा प्रकार विषयुक्त अन्न आणि पर्यावरणाच्या वैश्विक समस्येमुळे घडतो. वैश्विक समस्येचे निराकरणही पंचसूत्रीच्या माध्यमातून करणे शक्य होते. निसर्गाचा समतोलही साधने महत्वाचे आहे. त्यासाठी प्लास्टिकचा वापर कटाक्षाने टाळण्याचा प्रयत्न प्रत्येक जागरूक व्यक्तीने केलाच पाहिजे. पर्यावरणाचा समतोल साधण्यासाठी सेंद्रिय शेतीचा पर्याय सर्वोत्तम ठरू शकतो. शेतीच्या मातीचा पोत सुधारण्यासाठी देशी गाय पाळणे गरजेचे आहे. तसेच प्रत्येकाच्या घरात एकतरी देशी वृक्ष असावा, पाण्याच्या पुनर्वापराची जनजागरण मोहीम राबवणे आवश्यक असल्याचे प्राचार्य पांडे यांनी स्पष्ट केले.



आपले भारतीय आयुर्वेद शास्त्र अतिशय प्राचीन आहे. भारतात साडेसातशे वर्षांपूर्वी बायपास सर्जरी सुविधा असल्याचा उल्लेख चरकसंहितेत आढळून येतो. जगाला प्रगतीपथावर नेणारी विमान संकल्पनाही भारताचीच आहे. आजच्या स्थितीत समाजाच्या भरकटलेल्या जहाजाचे होकायंत्रही भारतमाता असल्याचे पांडे यांनी सांगितले.

प्रमुख अतिथी म्हणून आपले विचार व्यक्त करताना योगाचार्य भातलवंडे यांनी नवनिर्माण प्रतिष्ठानचे कार्य आजच्या स्थितीत अतिशय मौलिक आणि राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात महत्वपूर्ण योगदान देणारे असल्याचे सांगितले. यासाठी नवनिर्माण प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी अभिनंदनास पात्र असल्याचे सांगून त्यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना मंचावर पाचारण करून त्यांचा सन्मान केला. संतोष बीडकर यांनी वैयक्तिक पद्य सादर केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन धनंजय कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमास विविध स्तरातील मान्यवरांची उपस्थिती होती.

# मुंबई क्लायमेट वीक : हवामान कृतीसाठी भारताचा जागतिक मंच

मुंबईत होणारा भारतातील पहिला क्लायमेट वीक हा हवामान बदलावर केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष कृतीकडे नेणारा मंच ठरणार आहे. शासन, उद्योग, तज्ज्ञ, युवक आणि नागरिक यांना एकत्र आणत हा उपक्रम ग्लोबल साऊथ देशांसाठी हवामान नेतृत्वाचा नवा नमुना मांडणार आहे.

अन्नसुरक्षा, स्वच्छ ऊर्जा आणि शहरी शाश्र्वतता या तीन महत्त्वाच्या क्षेत्रांवर भर देत नवकल्पना, युवक सहभाग आणि लोकाभिमुख कार्यक्रमांद्वारे हवामान कृती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. हवामान बदलावर उपाय म्हणजे सामूहिक जबाबदारी आणि तातडीची कृती हा यानिमित्ताने मुंबईतून दिला जाणारा संदेश स्पष्ट आहे....

हवामान बदल ही भविष्यातील किंवा केवळ वैज्ञानिक चर्चेची गोष्ट राहिलेली नाही. पूर, उष्णतेच्या लाटा, अनियमित पाऊस, अन्नसुरक्षेची आव्हाने या सगळ्याचा थेट परिणाम आपल्या दैनंदिन आयुष्यावर होत आहे. अशा पार्श्र्वभूमीवर मुंबईत १७ ते १९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान होणारा मुंबई क्लायमेट वीक (MCW) हा भारतासाठी आणि विशेषतः ग्लोबल साऊथ देशांसाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

हा केवळ परिषदांचा कार्यक्रम नाही, तर संवादातून प्रत्यक्ष कृतीकडे जाण्याचा प्रयत्न आहे आणि त्याचे वैशिष्ट्य म्हणजे शासन, उद्योग, तज्ज्ञ, युवक आणि सामान्य नागरिक यांना एकाच मंचावर आणणे हे आहे.

प्रोजेक्ट मुंबई या संस्थेच्या वतीने हा उपक्रम आयोजित करण्यात आला असून महाराष्ट्र शासनाचा पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या सहकार्याने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे मुंबईला भारत तसेच इतर ग्लोबल साऊथमधील शहरांसाठी हवामान उपाययोजनांची प्रयोगशाळा होणार आहे.

**हवामान चर्चेपासून प्रत्यक्ष उपायांकडे**

मुंबई क्लायमेट वीकचा उद्देश केवळ हवामान बदलावर चर्चा करणे नसून, प्रत्यक्ष अंमलात आणता येतील असे उपाय शोधणे आणि त्यांना गती देणे हा आहे. मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे तीन दिवस मुख्य कार्यक्रम होतील, तर मुंबई शहरभर महाविद्यालये, समुदाय केंद्रे आणि सांस्कृतिक संस्थांमध्ये विविध उपक्रम राबवले जातील. त्यामध्ये नेतृत्व संवाद, विविध विषयांवरील ट्रॅक्स, चउथ इनोव्हेशन चॅलेंज, यूथ ग्रीन इनोव्हेशन चॅलेंज तसेच उपाययोजनांचे प्रदर्शन क्षेत्र आदींचा समावेश असणार आहे.

हब-अँड-स्पोक रचना म्हणजे एकाच वेळी धोरणात्मक चर्चा आणि लोकसहभाग दोन्ही गोष्टी साध्य करण्याचा प्रयत्न या निमित्ताने होणार आहे. हवामान कृती ही केवळ सरकारची जबाबदारी नसून समाजाच्या प्रत्येक घटकाचा सहभाग आवश्यक आहे, हा संदेश यातून दिला जाणार आहे.

मुख्य केंद्रातील पहिल्या दिवशी अर्थशॉट प्राईज या आंतरराष्ट्रीय उपक्रमाचे विशेष सत्र होणार असून, या सत्रात निसर्ग, अन्न प्रणाली आणि मानव यांवर लक्ष केंद्रित केले जाईल. केन्सिंग्टन पॅलेस (यूके) येथील पथकाच्या मार्गदर्शनाखाली होणारा हा उपक्रम प्रिन्स विल्यम यांच्या संकल्पनेतून साकारलेला असून, मुंबई क्लायमेट वीकमध्ये तो प्रथमच आणि विशेष स्वरूपात सादर केला जाणार आहे. या कार्यक्रमात ग्लोबल साऊथमधील हवामान नवोन्मेषक, प्रत्यक्ष उपाययोजना राबवणारे कार्यकर्ते तसेच भारतातील अग्रगण्य व्यक्ती सहभागी होणार असून, मोठ्या प्रमाणावर जनसहभाग वाढवण्याचा उद्देश आहे. याच कालावधीत विविध महाविद्यालये, वसाहती आणि सांस्कृतिक संस्थांमध्ये विविध कार्यक्रम होणार असून, त्यात रोड शो, कला व माध्यम उपक्रम तसेच सस्टेनेबिलिटी मेला यांचा समावेश आहे. या उपक्रमांद्वारे हवामान कृती दैनंदिन जीवनाचा भाग बनवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

वातावरण हे मुंबई क्लायमेट विकचे नागरिक संवाद व्यासपीठ असून, याद्वारे नागरिकांना त्यांच्या हवामानविषयक मतांची मुक्त आणि अनफिल्टर्ड मांडणी करता येणार आहे. भाषणे, कविता, कथा, गाणी आणि इतर सर्जनशील माध्यमांद्वारे हवामानाशी संबंधित दैनंदिन अनुभव आणि मते मुंबई क्लायमेट वीकच्या केंद्रस्थानी आणल्या जाणार आहेत.

**ग्लोबल साऊथचा आवाज**

हवामान बदलाचा सर्वाधिक परिणाम विकसनशील देशांवर होतो, परंतु उपाययोजनांच्या चर्चेत त्यांना कमी महत्त्व मिळते. मुंबई क्लायमेट वीक ग्लोबल साऊथ देशांसाठी एक नेतृत्व मंच उपलब्ध करून देणार आहे. मुंबई क्लायमेट वीक व्यापक भागीदारीच्या माध्यमातून राबवण्यात येत आहे. आयडीएफसी फर्स्ट बँक हा मुख्य भागीदार आहे. डेलॉईट ही धोरणात्मक ज्ञान भागीदार संस्था आहे. टाटा सामाजिक विज्ञान संस्था (टीआयएसएस) आणि आयआयटी बॉम्बे हे शैक्षणिक भागीदार आहेत.

एव्हरसोर्स कॅपिटल, इंडिया क्लायमेट कोलॅबोरेटिव्ह, शक्ती सस्टेनेबल एनर्जी फाउंडेशन, वर्ल्ड रिसोर्सेस इन्स्टिट्यूट (WRI) इंडिया, क्लायमेट ग्रुप, सी ४०, महिंद्रा ग्रुप, इंडियन मर्चंट्स चेंबर यांसारख्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांचा सहभाग असणार आहे. युनिसेफच्या युवाह (YuWaah!) या उपक्रमाद्वारे युवक सहभाग भागीदार असणार आहे.

या उपक्रमात ३० हून अधिक देशांतील प्रतिनिधी, आंतरराष्ट्रीय संस्था, वित्तीय संघटना आणि उद्योग क्षेत्रातील नेते सहभागी होणार आहेत. बिल गेट्स, हिलरी क्लिंटन यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, उद्योगपती आणि नेते यांची उपस्थिती या कार्यक्रमाला जागतिक महत्त्व देते.

यातून भारत हवामान विषयक नेतृत्व केवळ धोरण पातळीवर नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून दाखवण्याचा प्रयत्न करत आहे.

**तीन महत्त्वाचे केंद्रबिंदू**

मुंबई क्लायमेट वीकची संकल्पना तीन प्रमुख क्षेत्रांवर आधारित आहे:

१. अन्नप्रणाली (Food Systems) – हवामान बदलाचा शेती आणि अन्नसुरक्षेवर होणारा परिणाम लक्षात घेऊन टिकाऊ शेती आणि पोषण यावर भर.

२. ऊर्जा संक्रमण (Energy Transition) – पारंपरिक ऊर्जेऐवजी स्वच्छ आणि नवीकरणीय ऊर्जेकडे वाटचाल.

३. शहरी शाश्वतता (Urban Resilience) – शहरांना हवामान बदलाच्या परिणामांपासून सुरक्षित आणि सक्षम बनवणे.

हे तीनही घटक भारताच्या विकासाच्या केंद्रस्थानी आहेत, त्यामुळे हा कार्यक्रम केवळ पर्यावरण विषयापुरता मर्यादित राहणार नाही.

**नवकल्पना आणि युवकांची भूमिका**

मुंबई क्लायमेट वीकमध्ये नवोन्मेष हा केंद्रस्थानी असणार आहे. हवामान समस्यांवर नवे उपाय शोधण्यासाठी नॅशनल स्टॉक एक्स्चेंजच्या सहकार्याने 'इनोव्हेशन चॅलेंज' आयोजित करण्यात येणार आहे. स्टार्टअप, संशोधक आणि सामाजिक संस्था हे यामध्ये सहभागी होऊन आपले उपाय सादर करणार आहेत.

युवकांसाठी स्वतंत्र हरित नवकल्पना स्पर्धा असेल. युनिसेफच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष चर्चेत आणि उपाययोजनांमध्ये सहभागी केले जाणार आहे. भविष्यातील हवामान नेतृत्व घडवण्यासाठी हा महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो.

**विज्ञान, संस्कृती आणि नागरिक सहभाग**

मुंबई क्लायमेट वीकमध्ये नवोन्मेष हा केंद्रस्थानी असणार आहे. या सप्ताहात सार्वजनिक व्याख्याने, कला-संस्कृती कार्यक्रम, चित्रपट प्रदर्शन आणि नागरिक कार्यशाळा आयोजित केल्या जातील. हवामान बदल हा केवळ वैज्ञानिक विषय नसून सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्र्नही आहे, हे यातून अधोरेखित होते.

१८ फेब्रुवारी रोजी विशेष सत्रात भारताचे अंतराळवीर राकेश शर्मा आणि अंतराळवीर शुभांशु शुक्ला (दोघेही अशोक चक्र पुरस्कारप्राप्त) शालेय विद्यार्थ्यांशी तसेच जागतिक नेतृत्वाशी संवाद साधणार असून, अंतराळ संशोधन, विज्ञान आणि हवामान जबाबदारी यांचा परस्पर संबंध अधोरेखित केला जाणार आहे.

युनिसेफ (UNICEF) इंडिया आणि यु वाह (YuWaah) यांच्या भागीदारीत युवकांसाठी विशेष उपक्रम राबवले जाणार असून, १६ ते २४ वयोगटातील युवकांचा सहभाग असणार आहे. अन्न प्रणाली, ऊर्जा संक्रमण आणि शहरी लवचिकता या विषयांवरील युवकांच्या नवोन्मेषांचे प्रदर्शन मुंबई क्लायमेट वीकमध्ये करण्यात येणार आहे.

**हवामान कृतीचे नवे मॉडेल**

मुंबई क्लायमेट वीक ही भारत आणि ग्लोबल साऊथ देशाच्या नेतृत्वाखालील, नागरिक-केंद्रित हवामान कृतीचे नवे मॉडेल ठरणार आहे. मुंबई क्लायमेट वीक हा सार्वजनिक-खासगी-नागरिक भागीदारीवर आधारित उपक्रम आहे. यामधून शहर पातळीवर हवामान उपाययोजना राबविण्याचा भारतीय नमुना साकारणार आहे. जर या मंचातून ठोस भागीदारी, निधी आणि धोरणात्मक निर्णय घडले, तर तो भारत आणि ग्लोबल साऊथ देशांसाठी दिशादर्शक ठरू शकतो.

हवामान बदल हा भविष्यातील नव्हे, तर वर्तमानाचा प्रश्र्न आहे. मुंबई क्लायमेट वीक हा या वास्तवाला सामोरे जाण्याचा सामूहिक प्रयत्न असून जिथे कल्पना, विज्ञान, उद्योग आणि नागरिक सहभाग एकत्र असेल.

हवामान कृती ही सर्वांची जबाबदारी आहे, आणि बदलाची सुरुवात आजपासूनच करावी लागेल, हा संदेश मुंबई क्लायमेट विकच्या माध्यमातून जगभरात जाईल हे नक्की.

**नंदकुमार बलभीम वाघमारे**
**वरिष्ठ सहायक संचालक (माहिती)**
**माहिती व जनसंपर्क**
**महासंचालनालय, मुंबई**

## अंधारवाडीत विकासाचा उजेड; मधाच्या गावामुळे मिळाली नवी ओळख



विदर्भाचा सर्वागीण विकास करायचा असेल, तर केवळ शहरं नाही तर गावपातळीवर देखील लहान- मोठे उद्योग उभे राहावे, राज्यातील प्रत्येक छोट्या- छोट्या गावांचा विकास होऊन ती स्वावलंबी व्हावी, हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे असलेले स्वप्न अंधारवाडीत पूर्ण होताना दिसत आहे. गतवर्षी खादी ग्रामोद्योग मंडळाच्या सहकार्याने विदर्भात सुरू झालेला अंधारवाडी 'मधाचे गाव' प्रकल्प हा त्याचाच एक भाग आहे. गावात रोजगार निर्माण करून पर्यटनाला हातभार लावण्याचे असे लहान – मोठे प्रयोग लक्षणीय ठरतात. हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गालगत टिपेश्वरच्या जंगलाला लागून असलेल्या या गावात गोंड आणि कोलाम या आदिवासी जमातींचे वास्तव्य आहे. मधमाशांचा मुक्त संचार असलेल्या या परिसरातील झाडांवरच्या मधाच्या पोळ्यातील मध काढून ते २० किमीवरील पांढरकवड्याला ५० रुपये किलो दराने विकायचे. मात्र येथील मधाची उपलब्धता पाहून राज्य शासनाने मधाचे गाव म्हणून अंधारवाडी विकसित करण्याचा निर्णय घेतला आणि या गावाची वाटचाल स्वावलंबनातून समृद्धीकत्रडे सुरू झाली. दीड वर्षापूर्वी पांढरकवडा येथील तत्कालीन उपविभागीय अधिकारी सुहास गाडे यांनी गावकऱ्यांची बैठक घेऊन मधामुळे त्यांचे आयुष्य कसे बदलू शकते, हे समजावून सांगितले. गावकऱ्यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला आणि आता विद्यमान उपविभागीय अधिकारी अमित रंजन यांच्या नेतृत्वात अंधारवाडीची वाटचाल उजेडाकडे सुरू आहे.

येथे पूर्वी पारंपरिक पद्धतीने मध गोळा केले जायचे. मात्र शासनाने त्यांना शास्त्रीय पद्धतीने मध गोळा करण्याच्या पद्धत शिकविली. त्यासाठी दहा दिवसांच्या प्रशिक्षणासहच पुणे, महाबळेश्वर येथे त्यांचा अभ्यास दौराही केला. त्यामुळे मध संकलनात अन्यत्र काय सुरू आहे हे पाहून, मध आपले भाग्य बदलवू शकते, याची त्यांना खात्री पटली. आजवर ५० रुपये किलोने २० किमी दूर जाऊन विकाव्या लागणाऱ्या मधाला आता गावातच १००० रुपये किलोचा दर मिळू लागण्याचा चमत्कार यामुळे घडला आहे.

त्यासाठी शासनाने येथे २०० मधुमक्षिका पालन पेट्या दिल्या. घराच्या परिसरात किंवा लगतच्या जंगलात या पेट्या ठेवण्यात आल्या आहेत. मधमाशांचे पोळे या पेट्यांमध्ये तयार होते आणि पोळे पूर्ण झाले की, त्यातून मध काढण्यात येते. एका पेटीतून साधारण एक ते दोन किलो मध निघते, अशी माहिती येथील व्यंकटेश दळांजे यांनी दिली.

पूर्वी झाडावरील पोळ्यातून मध काढायचे म्हणजे झाडावर चढावे लागायचे. त्यातही कधी वन्यप्राणी तर कधी मधमाशांच्या हल्ल्याची भीती, पण आता त्यातून सुटका झाली आणि या सुरक्षित शास्त्रीय पद्धतीने गावातील महिलाही मध संकलित करू लागल्या आहेत. मध उत्पादन वाढण्यासाठी लवकरच येथे मधुबनची निर्मिती केली जाणार असून, त्यासाठी १२ एकर जागा निश्चित करण्यात आली आहे. आता फक्त मधावर आपला उदरनिर्वाह होऊ शकतो, याची खात्री गावकऱ्यांना पटली आहे. आजवर मध विकण्यासाठी फिरावे लागायचे, ती वणवण शासनाच्या प्रयत्नांनी थांबली आहे. या मधाला हक्काची बाजारपेठ नव्हती, मात्र आता टिपेश्वर अभयारण्यात येणारे पर्यटकच अंधारवाडीत येऊन मध खरेदी करतात, असे येथील विकास क्षीरसागर यांनी सांगितले. मधाचे गाव ही ओळख मिळाल्यामुळे पर्यटकांचा ओघ येथे वाढला. गावात पोहोचण्यासाठी पूर्वी रस्ता नव्हता, तो राज्य शासनाने प्राधान्याने केला. अंगणवाडीची नवीन इमारत, नवीन घरकुले, गावकऱ्यांना बसण्यासाठी परंपरा जपत बांधलेला पार, घरांच्या भिंतीवरची मधमाशांची रंगीत चित्रे येणाऱ्यांचे लक्ष वेधून घेतात.

मधामुळे उत्पन्न वाढून राहणीमान बदलले. आर्थिक स्थिती आता आधीसारखी राहिली नाही, अशी प्रतिक्रिया येथील पोलीस पाटील कविता दळांजे यांनी व्यक्त केली, तर प्रत्येक गोष्टीसाठी मोठ्या गावात जावे लागायचे. अडचणी यायच्या पण सरकारच्या या योजनेमुळे ते चित्र राहिले नसल्याचे लक्ष्मी टेकाम सांगतात.

येथील सरपंच लक्ष्मी भूजंग मेश्राम म्हणाल्या की, मधमाशांनी आमचे नशीबच बदलले. मधाला भाव तर मिळायला लागलाच पण अनेक सुविधा गावात आल्या. आधी रस्ता नसल्याने कोणतेही वाहन गावात येऊ शकत नव्हते. रुग्णाला खाटेवर दवाखान्यात न्यावे लागायचे. आता ती परिस्थिती राहिलेली नाही. टिपेश्वरला येणाऱ्या पर्यटकांना येथे मध तर मिळतेच पण गावकरी त्यांना बैलबंडीची सफारी घडवितात. बैलबंडीचे अप्रुप असलेले पर्यटक त्यात बसून गावात चक्कर मारतात. त्याचे पाचशे रुपये मिळतात. याशिवाय पर्यटकांसाठी पारंपरिक गोंडी नृत्यही सादर करण्यात येते. त्याकरिता शासनाने एक खुले सभागृह बांधून दिले आहे.

'मधाचे गाव' प्रकल्पामुळे या गावात विकासगंगा पोहोचली आणि येथील अर्थकारण लक्षणीय बदलले. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत या उपक्रमाला साह्य करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे शबरी आदिवासी अर्थ विकास महामंडळाच्या शबरी नॅचरल्समध्ये या मधाचा समावेश करण्यात येणार आहे. त्यामुळे देशात कुठूनही या मधाची खरेदी करता येईल. लवकरच गावात मध विक्रीचे केंद्र तयार करण्यात येणार असल्याची माहिती पांढरकवडा येथील उपविभागीय अधिकारी अमित रंजन यांनी दिली.

मधाच्या गावाची ही सुरुवात आहे. कायमस्वरूपी मधुबन, मार्केटिंग, पॅकेजिंग आणि अन्य बाजारपेठ, प्रसिद्धी असे अनेक टप्पे बाकी आहेत. हे जरी खरी असले तरी सुरुवात होणे ही बाब देखील तेवढीच महत्त्वाची आहे. स्थानिक संसाधनांचा उपयोग करून गाव कसे समृद्धीकडे नेता येऊ शकते, याचा आदर्श अंधारवाडीने घालून दिला आहे हे निश्चित.

**– अविनाश महालक्ष्मे**

# डीआरएम सोलापूर रेल्वे सेवा पुरस्कार २०२५ संपन्न | सोलापूर विभागातील ३० रेल्वे कर्मचारी आणि ९ विभागांना अनुकरणीय योगदानाबद्दल गौरविण्यात आले



**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने १३ फेब्रुवारी २०२६ रोजी सिद्धेश्वर रेल्वे ऑफिसर्स क्लब ऑडिटोरियम हॉल, सोलापूर येथे ७० वा रेल्वे आठवडा २०२५ कार्यक्रम आयोजित केला होता. या प्रसंगी, सोलापूर विभागातील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम), सोलापूर विभाग, डॉ. सुजीत मिश्रा यांनी सोलापूर विभागातील रेल्वे कर्मचाऱ्यांच्या अनुकरणीय योगदानाची दखल घेऊन रेल्वे सेवा पुरस्कार २०२५ प्रदान केला.

या कार्यक्रमात ३० उत्कृष्ट कर्मचाऱ्यांना व्यक्तिगत पुरस्कार आणि उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आगारांना ९ कार्यक्षमता शिल्डचे वितरण करण्यात आले. विभागीय स्तरावर विशिष्ट रेल सेवा पुरस्कार २०२५ चे विजेते आणि ०९.०२.२०२६ रोजी झालेल्या डीआरएमच्या स्वच्छता तपासणीतील विजेत्यांचाही सत्कार करण्यात आला.

वैयक्तिक पुरस्कार विजेते: त्यांच्या संबंधित विभागातील खालील कर्मचाऱ्यांना त्यांच्या उत्कृष्ट कार्यासाठी पुरस्कार देण्यात आला:

लेखा विभाग:
१. अमित कुमार – अकाउंट असिस्टंट, सोलापूर

जनरल ॲडमिन:
२. योगेश कुमार – स्टेशन मास्टर, सोलापूर

स्थापत्य अभियांत्रिकी विभाग:
३. फुलचंद लक्ष्मण – वरिष्ठ तंत्रज्ञ (मेसन), शहाबाद
४. रवी कुमार राजपाल सिंग – वरिष्ठ विभाग अभियंता (कायमस्वरूपी मार्ग), सोलापूर
५. राहुल कृष्णा शिंदे – ट्रॅक मेंटेनर–III, मोडनिंब
६. बालाजी बाबर – वरिष्ठ विभाग अभियंता (कायमस्वरूपी मार्ग), बार्शी टाउन
७. लक्ष्मण सारंगधर रणदिवे – ट्रॅक मेंटेनर–खत, कुर्डुवाडी
८. विकास महादेव राठोड – ट्रॅक मेंटेनर–खखख, होटगी
९. ओम प्रकाश बिजर्निया – कनिष्ठ अभियंता (कायमस्वरूपी मार्ग), मोहोळ
१०. राजकुमार प्रसाद – ट्रॅक मेंटेनर–III, बबलाद

वाणिज्य विभाग:
११. काळे आनंद महादेव – मुख्य व्यावसायिक निरीक्षक, कुर्डुवाडी
१२. मोबीन शेख – ट्रेन तिकीट निरीक्षक (TTI), सोलापूर

यांत्रिक CW (कॅरेज आणि वॅगन) विभाग:
१३. मल्लिकार्जुन हंचप्पा – वरिष्ठ तंत्रज्ञ, वाडी
१४. चिंतामणी मोगे – वरिष्ठ विभाग अभियंता, पंढरपूर

इलेक्ट्रिकल (सामान्य) विभाग:
१५. मलप्पा अच्छिगर – सहाय्यक/TI AC, सोलापूर

इलेक्ट्रिकल TRD (ट्रॅक्शन वितरण) विभाग:
१६. एस.एच. मुलामणी – मुख्य लोको निरीक्षक (सीएलआय)/लोको, सोलापूर
१७. आर.डी. कुलकर्णी – मुख्य लोको इन्स्पेक्टर (सीएलआय)/लोको, कुर्डुवाडी
१८. प्रमोद नरटवडेकर – वरिष्ठ विभाग अभियंता (TRD), सोलापूर
१९. एंडेला महेश बाबू – वरिष्ठ विभाग अभियंता (TRD), दुधनी

वैद्यकीय विभाग:
२०. शिवेंद्र प्रताप सिंग – मुख्य नर्सिंग पर्यवेक्षक, सोलापूर

ऑपरेटिंग विभाग:
२१. ठाकूर मुकेश कुमार – स्टेशन मास्टर, होटगी
२२. सुनील कुमार सुमन – स्टेशन मास्टर, धाराशिव
२३. अनिकेत सिंग – पॉइंट्समन–बी, बाले
२४. दीन बंधू– स्टेशन मॅनेजर, सोलापूर

कार्मिक विभाग:
२५. समाधान भरत कोळी – ऑफिस सुपरिंटेंडेंट, सोलापूर

सुरक्षा विभाग:
२६. रितेश कुंभार – हेड कॉन्स्टेबल, सोलापूर

सिग्नल आणि टेलिकम्युनिकेशन विभाग:
२७. रशीद हमीद शियाख – टेक्निशियन ग्रेड–खखख (टेलिकॉम, टीसीएम), सोलापूर
२८. सुहास माने – कनिष्ठ अभियंता (सिग्नल), पंढरपूर

सुरक्षा विभाग:
२९. दुर्गाचरण नागले – वरिष्ठ विभाग अभियंता (टीआरडी), सोलापूर

स्टोअर्स विभाग:
३०. अश्वनी राणा – डेपो मटेरियल सुपरिटेंडेंट, सोलापूर

इंटर–डेपो कार्यक्षमता शिल्ड विजेते: खालील डेपोंना ऑपरेशनल कार्यक्षमता, देखभाल आणि देखभालीमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल विविध श्रेणींमध्ये कार्यक्षमता शिल्ड प्रदान करण्यात आल्या.

सेवा वितरण:
१. वाणिज्य कार्यक्षमता शिल्ड – आयओसीएल साईडिंग, पाकणी
२. ऑपरेटिंग कार्यक्षमता शिल्ड (सर्वोत्तम यार्ड) – वाडी यार्ड
३. ऑपरेटिंग कार्यक्षमता शिल्ड (सर्वोत्तम स्टेशन) – वाशिंबे स्टेशन
४. इंटर डेपो सी अँड डब्ल्यू शील्ड – कॅरेज आणि वॅगन (सी अँड डब्ल्यू) डेपो, सोलापूर
५. सर्वोत्तम क्रू बुकिंग लॉबी – क्रू लॉबी, सोलापूर
६. वैद्यकीय विभाग – रेल्वे रुग्णालय, वाडी
७. इलेक्ट्रिकल (सामान्य) – इलेक्ट्रिकल (देखभाल), सोलापूर
८. इलेक्ट्रिकल (टीआरडी) – टीआरडी (ट्रॅक्शन डिस्ट्रिब्यूशन) डेपो, केत्तूर
९. सिग्नल आणि टेलिकम्युनिकेशन्स – टेलि डेपो, सोलापूर

या कार्यक्रमाला सीआरडब्ल्यूडब्ल्यूओ सोलापूरचे पदाधिकारी, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक (एडीआरएम) श्री अंशुमाली कुमार, शाखा अधिकारी, रेल्वे युनियन प्रतिनिधी आणि सोलापूर विभागातील रेल्वे कर्मचारी उपस्थित होते.

रेल्वे सप्ताह साजरा करणे ही रेल्वे कर्मचाऱ्यांच्या समर्पणाची आणि कठोर परिश्रमाचा गौरव करण्याचा क्षण आहे. प्रवाशांना आणि मालवाहतूक ग्राहकांना कार्यक्षम आणि उच्च दर्जाच्या सेवा देण्याच्या सोलापूर विभागाच्या वचनबद्धतेवर हे अधोरेखित करते.

# टोमॅटो खाण्याचे हे फायदे




जर तुम्हाला सलग ३० दिवस टोमॅटोचा रस प्या असे सांगितले तर तुम्ही प्याल का? असा प्रश्न आहे. पण तुम्हाला जर महिनाभर टोमॅटोचा रस प्यायल्याने होणारे कमालीचे बदल सांगितले तर मात्र तुम्ही आजपासूनच टोमॅटोचा रस प्यायला सुरूवात कराल. कारण आपल्या स्वयंपाकघरात रोज दिसणारा टोमॅटो, केवळ भाजीतला रंग बदलत नाही तर आरोग्याचा रंगही बदलू शकतो. टोमॅटो हा एक नैसर्गिक औषधाचा खजिना आहे. त्यामुळे टॉमेटोचा रस रोज प्यालात तर तुम्हाला रोजच्या जीवनात अनेक महत्त्वाचे फायदे होऊ शकतात. टोमॅटोमुळे होणारा पहिला आणि महत्त्वाचा फायदा म्हणजे टोमॅटोमध्ये असलेले घटक 'बॅड कोलेस्ट्रॉल' कमी करून 'गुड कोलेस्ट्रॉल' वाढवतात. त्यामुळे हृदयाचं आरोग्य सुधारून हार्ट अटॅकचे प्रमाण कमी होते. दुसरं म्हणजे दररोज टोमॅटोचा रस प्यायल्याने किडनी आणि मूत्रसंस्था स्वच्छ राहते. यामुळे युरिनच्या समस्यांना पुर्णविराम मिळतो. तसेच शरीरातील टॉक्सिन्स बाहेर पडतात. चेहऱ्याची त्वचा नितळ ठेवण्यासाठी फॉलो करा या टिप्स! आपल्या शरीरात जेव्हा एखादा बदल होतो, तेव्हा त्याचा परिणाम लगेच आपल्या चेहऱ्यावर दिसतो. जसे की, आपण अतिउष्ण पदार्थ खाल्ले तर चेहऱ्यावर पुरळ ...तिसरं म्हणजे टोमॅटोमध्ये मुबलक 'व्हिटॅमिन के' असतं. त्यामुळे हाडे मजबूत होतात. टॉमेटोच्या रसामुळे वजन नियंत्रणात राहतं. त्यामुळे तुम्हाला जर वजन कमी करायचे असेल तर महिनाभर टॉमेटोचा रस प्या. जे लोक फिटनेसकडे लक्ष देतात, त्यांच्यासाठी तर टोमॅटोचा रस नैसर्गिक डिटॉक्स ड्रिंक आहे. शरीराप्रमाणेच त्वचेलाही टोमॅटोचा फायदा होतो. टोमॅटोतील लाइकोपीन हे अँटिऑक्सिडंट त्वचेवरील डाग कमी करतात आणि सूर्यकिरणांपासून त्वचेचं संरक्षण करतात. त्यामुळे टोमॅटोमुळे चेहऱ्यावरचा ग्लो वाढतो!

आता तुम्हाला टोमॅटोचा रस कसा करावा असा प्रश्न पडला असेल?

टोमॅटोचा रस करण्यासाठी टोमॅटो स्वच्छ धुवा, कापा आणि मिक्सरमध्ये वाटा. त्यात थोडं मीठ, काळी मिरी, आलं आणि लिंबाचा रस मिसळा. अशाप्रकारे तुम्ही रोज टोमॅटोचा रस प्यायलात तर नक्कीच शरीराला महत्त्वाचे फायदे होतील.

# संत निळोबाराय



नाही त्या उरले दुजे ने कृष्णवीण।
बाह्य अंतःकरण कृष्ण झाला ।।
जीवाचाही जीव शिवाचाही शिव
। देही देहभान कृष्ण झाला ।।
शब्दां शब्दविता बोधा बोधविता
। चित्रा चेतविता कृष्ण झाला ।।
निळा म्हणे कृष्णे केले कृष्णाकार
। सबाहय अंतर रंगविले ।। – संत निळोबाराय

संत निळोबाराय हे संत तुकारामांचे शिष्य. तुकाराम महाराजांचे अनन्य भक्त. संत तुकारामांप्रमाणे त्यांची अभंगरचना प्रासादिक, निर्भिड आणि मर्मभेदी आहे. या अभंगात त्यांनी आपल्या कृष्णमय झालेल्या अनुभूतीचे वर्णन केले आहे. ते म्हणतात, 'आता कृष्ण रंगाविना दुसरे काहीच उरले नाही. अंतर्बाह्य कृष्णानेच व्यापले आहे. जीवाचा जीव आणि शिवाचा शिव असे अवघे कृष्णरूपच आहे. देहाचे देहभावही कृष्णरूप झाले आहेत. शब्दांना शब्दरूप देणारे, बोधालाही बोध करणारे, मनाला चैतन्य देणारे असे जे आहे ते कृष्णरूपच आहे. कृष्णाच्या नामाने, त्याच्या ध्यासाने आपण कृष्णच होतो. अंतर्बाह्य कृष्णरंगात रंगून जातो. संत निळोबांनी रात्रंदिन कृष्णनामाचा आणि कृष्णरूपाचा ध्यास घेतला होता. तनामनात, विचारात, ध्यानीमनी, आतबाहेर कृष्णरंगच दाटून राहिला होता. अवघे अस्तित्व त्या सावळ्याच्या स्वरूपी विरघळून गेले होते. कृष्णाकार झाले होते. श्वक 'कृष्ण द्यावा कृष्ण घ्यावा। अवघा ल्यावा कृष्णरंग' ।। अशी त्यांची अवस्था झाली होती.

कृष्ण म्हटलं की आठवते त्याची सावली, शामल तनू, त्याची चराचराला मुग्ध करणारी बासरी आणि डोईवर खोवलेले आनंदरूप मोरपीस. यमुनेकाठचा रासरंग म्हणजे आनंदाचा उत्सव. दुःखाचे ताणतणाव विसरुन संगीताच्या तन्मय लयीत आयुष्याचा आनंदाचा, चैतन्याचा अनुभव घ्यावा, हे कृष्णाचे आयुष्यविषयक 'तत्वज्ञान'. कृष्ण शब्दांपेक्षा आपल्याशी कृतीतून अधिक बोलतो, आयुष्यातील दुःखाला छेद देत आयुष्यात पर्व उभे करणे हे कृष्टनीतीचे तत्व आहे. ॐॅग्र कृष्ण म्हणजे न्यायाला संरक्षण, कृष्ण म्हणजे उन्मत्त शक्तींना शासन, कृष्ण म्हणजे लोककल्याणासाठी असलेले सिंहासन. कृष्ण म्हणने अंधाराचा अंत. कृष्ण म्हणजे प्रकाशाचे तेजोमय पर्वः.

संत निळोबाराय कृष्णरंगात एकरूप झाले आहेत. सारे काही कृष्णरंगाचा लयीत रंगून गेले आहे, यमुनेचा पाण्यासारखा कृष्णरंग मनात प्रवाहित झाला आहे. कृष्णरंगाची ही धून आपल्यालाही आनंदाची अनुभूती देते, शब्दांचे शब्दपण, जीवाचे जीवपण, बोधाचे बोधपण ज्यात समरस होते अशा कृष्णपणाची अनुभूती आपल्या जाणिवांना समृद्ध करते.

## १ Doctor Tips – सल्ला डॉक्टरचा



ग्रीक जोडपे एका वर्षात सरासरी १३८ वेळा वैवाहिक सुख घेतात. तर जपानी जोडपे सगळ्यात कमी म्हणजे ४५ वेळा वैवाहिक सुख घेतात.९. पुरुषांच्या लिंगातून वीर्य निघण्याची गती ३६.९ कि.मी. प्रति तास इतकी असते, जो उसेन बोल्टचा १०० मीटर चा रेकॉर्ड तोडण्यासाठी पुरेसे आहे. १०. एका वयस्कर पुरुषांच्या अंडकोषात एवढे शुक्राणू असतात कि त्यांना ४०४ मीटर पर्यंत पसरून ठेऊ शकतात. (**क्रमशः**)

## २ Joke – विनोद




बाबू – तुझे वडील किती वर्षाचे आहेत.
राजू – माझ्याच वयाचे आहेत.
बाबू – अरे पण हे कसं शक्य आहे.
राजू – का नाही शक्य? अरे मी जन्मलो, नि ते वडील बनले ना स!

## ३ Message – संदेश



Santa's Morning workout
santa 2 doctor-apne kaha tha ki subah khelne se sehat thik rehti hai pr muje to koi fark nai pada?
doctor-konsa game khelteho?
santa-mobile mai snake wala .

## ४ Thought – सुविचार




ज्याला शत्रू नसतात त्याला अनुयायी देखील नसतात.– **डॉन प्याट**

**संस्कृत सुभाषित**
**रसान्तराण्येकरसं यथा दिव्यं पयोऽश्नुते।**
**देशे देशे गुणष्वेव मवस्थास्त्वमविक्रियः।।**

**मराठीत अर्थ**
आकाशातून पृथ्वीवर एकाच प्रकारचे पाणी पडते, पण जमिनीवरील निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे रस पाण्यात मिसळतात. तसेच निर्गुण आणि निराकार परमेश्वर पृथ्वीवर वेगवेगळ्या अवस्थांत दिसतो.

# महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या–चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत–बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म–मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तर

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तर

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रसवान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत




# आम्ही काय इथे हात लावायला आलोय का

## अनुश्रीच्या विचित्र आरोपानंतर सागरने चांगलीच खरडपट्टी काढली, रुचिताने घातला वितंड वाद




मुंबई-'बिग बॉस मराठी'च्या घरात प्रेक्षकांना सीजन सुरू झाल्यापासून स्पर्धकांमध्ये वादविवाद पाहायला मिळत आहेत. बिग बॉस मराठीच्या घरात काल अनुश्री आणि राकेश बापट या दोघांमध्ये बेडवरून वाद झाला. अनुश्री राकेशच्या बेडवर झोपली होती. राकेशची प्रकृती बरी नसल्याने डॉक्टरांनी त्याला औषधही पाठवली होती. राकेशने आधी 'प्लीज माझ्या जागेवरून उठ आणि दुसरीकडे झोप' अशी विनंती अनुश्रीला केली होती. अनेकदा समजावूनही अनुश्रीने त्याचा ऐकलं नाही. घरातील सदस्यांनाही त्याने विनंती केली की 'तिला माझ्या जागेवरून उठवा.'शेवटी कंटाळलेल्या राकेशने तिचा हात धरून तिला उठवले. पण दुसऱ्या दिवशी सकाळी 'राकेशने हात लावून आपल्याला खेचले' असे म्हणत तिने कांगावा केला. यावरून बिग बॉसच्या घरात मोठा वितंड वाद सुरू झाला होता. या वादानंतर कलर्स मराठीने घरातील एक प्रोमो शेअर केला आहे. यात अनुश्रीच्या विचित्र आरोपांवर सागर कारंडेने अनुश्रीचे सगळेच बोलणे बाहेर काढले. अनुश्रीने केलेले आरोप चुकीचे असल्याचे सांगत सागरने राकेशची बाजू घेतल्याचे दिसले. काय म्हणाला सागर कारंडे ?

अनुश्रीच्या आरोपांवर सागर प्रचंड चिडलेला दिसला. त्याने अनुश्रीला आणि रुचिता जामदारला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. यावेळी सागर म्हणाला,' त्यावेळीच तू जर सांगितलं असतं की मला हात लावलेला चालणार नाही. तर त्यानेही मान्य केलं असतं की नाही लावणार बाई. थँक्यू मला सांगितल्याबद्दल. संपतो मुद्दा . आता माझ्याही डोक्यात आलंय रे तुम च्याशी बोलताना पण मला भीती वाटायला लागली आहे आता.' यावर अनुश्री 'मी त्याच्याशी बोलायला जाऊ का?' असे विचारते तेव्हा विशाल तिला 'आता जेवढे बोलायला जाशील तेवढा तो वरचढ दिसेल आणि तू चुकीची दिसशील' असे त्याने तिला सांगितले.सागरने अनुश्रीला समजावून सांगताना म्हटले, 'कुठल्याही माणसाला इव्हन तू मलाही म्हणाली असतीस तरी मला वाईट वाटले असते. आम्ही तुम्हाला बहिणीसारखा मानतो यार .आणि तुम्ही म्हणता हात लावायचा नाही.आम्ही इथे हात लावायला आलो काय? इथे कोणालाही कॅरेक्टरवर जायची गरजच नाहीये. इथे प्रत्येक जण गेम खेळायला आला आहे. हा मुद्दा नाहीये. हा मुद्दा काढण्याची गरजही नाही. जर तुम्हाला वाईट वाटत होतं तर त्याच वेळेस बोलायला पाहिजे होतं तुम्ही. यापुढे जरा लक्षात ठेवा. हे घडवून दिवस जातो तास लोटतात तेव्हा तुम्ही बोलता. आता विषय वेगळा चाललाय. इथून तिथे विषय कसा जातो.'

रुचिताने वाद वाढवला-सागरच्या या बोलण्यावर रुचिता जामदार पुन्हा एकदा डिफेन्सिव्ह झालेली दिसली. 'मी कोणाच्याही कॅरेक्टर वर गेलेली नाही. मुद्दा कॅरेक्टरचा नाही परमिशनचा आहे. कुठलीही मुलगी असली असती तरी मी हेच बोलले असते. राकेशचा एक्सपिरीयन्स अनेक वर्षांचा आहे. त्यामुळे बिग बॉस मलाच बोलणार. कारण मी नवखी आहे. पण किती जरी वेळा मला रितेश भाऊ जरी बोलले तरी मी हेच बोलन की माझा इंटेंशन ते नव्हते म्हणजे नव्हते. अगदी भाऊ बोलले तरी. अख्ख घर माझ्या विरुद्ध असले तरी .' असे म्हणत रुचिताने वाद वाढवल्याच दिसले.

# नेहा कक्करने घटस्फोटाच्या अफवांवर लावला पूर्णविराम, दिले सोशल मीडियाद्वारे स्पष्टीकरण...





मुंबई-गायिका नेहा कक्कर अलीकडील सोशल मीडिया पोस्टमुळं चर्चेत आली होती. तिची पोस्ट सोशल मीडियावर इतकी व्हायरल झाली होती, की त्यामुळं तिला अनेक प्रश्न चाहते विचारू लागले होते. तिनं आपल्या पोस्टमध्ये लिहिलं होतं, की ती नातेसंबंध आणि कामापासून ब्रेक घेत आहे. यानंतर तिनं काही मिनिटांमध्ये आपली पोस्ट सोशल मीडियावरून डिलीट केली होती. यानंतर सोशल मीडियावर तिच्या वैयक्तिक जीवनाबद्दल काही यूजर्स हे अंदाज बांधत होते. गायिकाच्या घटस्फोटच्या बातम्या या सोशल मीडियावर व्हायरल झाल्या होत्या. आता नेहानं उद्भवलेल्या घटस्फोटाच्या अफवांना स्पष्टपणे फेटाळून लावल्या आहेत. गायिकेनं तिचे मौन सोडले आहे आणि लोकांना सत्य कळवले आहे.

घटस्फोटाच्या अफवांवर दिलं नेहानं स्पष्टीकरण : सोमवारी, नेहानं इंस्टाग्राम स्टोरीजवर स्पष्ट केलं की, तिच्या पतीला किंवा कुटुंबाला यात ओढले जाऊ नये. तिनं लिहिलं, 'मित्रांनो, कृपया माझ्या निष्पाप पतीला किंवा माझ्या प्रेमळ कुटुंबाला यात ओढू नका. ते माझ्या ओळखीचे सर्वोत्तम लोक आहेत आणि मी त्यांच्या पाठिंब्यामुळेच आहे.' तिनं स्पष्ट केलं की तिला काही व्यवस्था आणि लोकांशी समस्या आहेत, मात्र त्याचा तिच्या कुटुंबाशी किंवा पतीशी काहीही संबंध नाही. याशिवाय तिनं पुढं लिहिलं, 'असे अनेक लोक आणि व्यवस्था आहेत, ज्यांमुळं मी नाराज आहे. मला वाटते की तुम्ही आता समजून घ्याल आणि कृपया माझ्या पतीला आणि कुटुंबाला या सर्वांपासून दूर ठेवा.' नेहानं इंस्टाग्रामवर ही भावनिक पोस्ट शेअर केली आहे. नेहाने चूक मान्य केली : नेहाने सोशल मीडियावर भावनिक पोस्ट करण्याची तिची चूकही मान्य केली. तिने पुढे लिहिले 'हो, मी सहमत आहे की, सोशल मीडियावर पोस्ट करताना मी इतके भावनिक होऊ नये, कारण मीडियाला तीळाचा डोंगर कसा बनवायचा हे चांगलेच माहित आहे. मी माझा धडा शिकले आहे. आतापासून, मी माझ्या वैयक्तिक आयुष्याबद्दल बोलणार नाही, माफ करा आणि धन्यवाद. काळजी करू नका, मी लवकरच आणि धमाकेदार पद्धतीने परत येईन. खूप प्रेम.' तसेच यापूर्वी नेहाने पापाराझींसाठी लिहिले होते की, 'मला या जगात मुक्तपणे जगू द्या. प्लीज कोणताही कॅमेरे नको.' नेहाचे अलीकडेच 'कँडी शॉप' हे गाणे आले होत, ज्यामुळे ती ट्रोल झाली होती. या गाण्यामध्ये तिच्या डान्स स्टेपला 'स्वस्त' आणि 'अील' असल्याचे लोकांनी म्हटले होते. हे गाणे तिचा भाऊ टोनी कक्करने तयार केले होते.

## सलमान-शाहरुख झाले करण-अर्जून...



बॉलिवूड अभिनेत्री सोनम कपूर आणि बिजनेसमॅन आनंद आहुजा यांचा बहुचर्चित विवाहसोहळा नुकताच पार पडला. सोनमच्या आईला पाहताच सलमान-शाहरुख झाले करण-अर्जून...

मुंबई : बॉलिवूड अभिनेत्री सोनम कपूर आणि बिजनेसमॅन आनंद आहुजा यांचा बहुचर्चित विवाहसोहळा नुकताच पार पडला. सोनमच्या रिसेप्शनला बॉलिवूडकरांची अपार गर्दी लोटली. या रिसेप्शनमध्ये बॉलिवूडचा किंग खान आणि दबंग खान एकत्र दिसले. आपल्या धमाकेदार अंदाजाने सलमान शाहरुखने खूप मज्जा आणली.

सोनम कपूरची आई सुनीता कपूर हिला पाहताच दोघांनी त्यांच्य जून्या सिनेमातील करण अर्जूनचा अवतार घेतला आणि गाणे गायला सुरुवात केली. या रिसेप्शनमधील एक व्हिडिओ जबरदस्त व्हायरल होत आहे. ज्यात शाहरुख सलमान करण अर्जून सिनेमातील ये बंधन तो प्यार का बंधन है हे गाणे गात आहेत. त्यावेळी अनिल कपूरची पत्नी सुनीता कपूर यांना पाहुन, त्यांचा पदर पकडून दोघे गाणे गात आहेत. त्यावेळेस सुनीता कपूर बोलत आहेत की, कोणीतरी यांना थांबवा, मला करण अर्जूनपासून वाचवा. त्यावेळेस तिथे उपस्थित अनिल कपूर जोरजोरात हसू लागतो. पहा हा धमाकेदार व्हिडिओ... मंगळवारी मुंबईतील द लीला हॉटेलमध्ये सोनम कपूर आणि आनंद आहुजा यांच्या लग्नाचे ग्रँड रिसेप्शन झाले. त्याच दिवशी सकाळी दोघांचा पंजाबी पद्धतीने विवाह झाला.

## पलाश मुच्छल केसात कोर्टाचा मोठा निर्णय !

### स्मृती मानधनाच्या मित्रावर गंभीर आरोप

**महत्त्वाचे मुद्दे**

मुंबई उच्च न्यायालयाने विज्ञान माने याला पलाश मुच्छल आणि त्यांच्या आईविरुद्ध मीडिया मुलाखतींमध्ये किंवा डिजिटल प्लॅटफॉर्मवर बदनामीकारक विधान करण्यास मनाई केली आहे.

न्यायालयाने म्हटले की, स्मृती-पलाशच्या लग्नाशी संबंधित घटना प्रथमदर्शनी प्रकरणाशी संबंधित ना-हीत आणि वादी व प्रतिवादी यांच्यात व्यावसायिक वाद आहे.

पलाश मुच्छल यांनी १० कोटी रुपयांची मानहानी नोटीस विज्ञान माने यांना पाठवली असून, कोर्टाच्या आदेशामुळे त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबाच्या प्रतिष्ठेचे रक्षण झाले आहे.

बॉलिवूड आणि क्रिकेट जगतात चर्चेत आलेले स्मृती मानधना (डीळींळ चरप-वहरपर) आणि गायक-संगीतकार पलाश मुच्छल (झरश्रीह चींलहहरश्र) यांचे लग्न २३ नोव्हेंबर २०२५ रोजी ठरले होते, मात्र स्मृतीच्या वडिलांची तब्येत बिघडल्यामुळे हा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला. त्यानंतर काही दिवसांनी स्मृतीनेच हे लग्न मोडल्याची घोषणा केली होती, ज्यामुळे सोशल मीडियावर आणि माध्यमांमध्ये मोठी चर्चा सुरू झाली.

**विज्ञान मानेच्या आरोपांचा पाया**

स्मृती मानधनाचा बालपणीचा मित्र आणि चित्रपट निर्माता विज्ञान माने यांनी पलाश मुच्छलवर अनेक गंभीर आरोप केले होते. यामध्ये आर्थिक फसवणूक झाल्याचा दावा, बदनामीकारक विधानांचे प्रसार, तसेच प्रतिष्ठा धोक्यात आणल्याचा आरोप होता. विज्ञान माने यांनी सांगितले की, पलाशने त्यांच्या पैसे परत केले नाहीत आणि मुलाखतींमध्ये त्यांनी खोटे आणि बदनामीकारक विधान केले आहे.

**पलाश मुच्छलचा न्यायालयात दावा**

पलाश मुच्छल यांनी आपल्या वकिलांद्वारे (सिद्धेश भोळे, अश्विनी पिंपळे आणि श्रेयस मिठारे) मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. त्यांनी दावा केला की विज्ञान माने यांनी माध्यमांमध्ये आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवर दिलेल्या मुलाखतींमुळे त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबाच्या प्रतिष्ठेला गंभीर हानी पोहोचली आहे. तसेच, त्यांनी नुकसानभरपाईसाठी आणि कायमस्वरूपी मनाई आदेशासाठी अर्ज केला.

कोर्टात सादर केलेल्या माहितीमध्ये म्हटले आहे की, विज्ञान माने हे व्यावसायिक व्यवसायिक असून, त्यांचा पलाश मुच्छलशी चित्रपट फायनान्सिंगचा व्यावसायिक वाद आहे. स्मृती-पलाशच्या लग्नाशी संबंधित घटना ही प्रथमदर्शनी प्रकरणाशी थेट संबंधित नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

**न्यायालयाचे निरीक्षण**

न्यायमूर्ती मिलिंद जाधव यांच्या एकल खंडपीठाने विज्ञान माने याच्या मुलाखतींच्या प्रतींचा अभ्यास केला आणि म्हटले की, वादी (मुच्छल) आणि प्रतिवादी क्रमांक १ (माने) यांच्यात व्यावसायिक वाद आहे. लग्नाशी संबंधित घटना प्राथमिक दृष्ट्या प्रकरणाशी संबंधित नाहीत.

खंडपीठाने विज्ञान माने याला फटकारताना निर्देश दिले की, आधी दिलेल्या मुलाखतींमध्ये किंवा डिजिटल प्लॅटफॉर्मवर पलाश मुच्छल आणि त्यांच्या आईविरुद्ध बदनामीकारक विधान करणे बंद करावे.



तसेच, भविष्यात असे कोणतेही विधान करणे प्रतिबंधित केले आहे.

**पलाश मुच्छलची प्रतिक्रिया**

याबाबत पलाश मुच्छल यांनी इंस्टाग्रामवर अधिकृत विधान दिले. त्यांनी सांगितले, 'माझे वकील श्रेयस मिठारे यांनी सांगली येथील विज्ञान माने यांना मानहानीबाबत १० कोटी रुपयांची कायदेशीर नोटीस पाठवली आहे. त्याने माझी प्रतिष्ठा जाणूनबुजून खराब करण्यासाठी खोटे, हास्यास्पद आणि अत्यंत बदनामीकारक आरोप केले आहेत.'

पलाश मुच्छल यांनी या निर्णयामुळे न्यायालयाने त्यांची आणि त्यांच्या कुटुंबाची प्रतिष्ठा सुरक्षित केली असल्याचे म्हटले आहे. कोर्टाचा आदेश विज्ञान माने याला भविष्यात पलाश मुच्छलविरुद्ध बदनामीकारक विधान करण्यापासून रोखतो, ज्यामुळे प्रकरणाची अधिक गंभीरता टळली आहे.

या आदेशामुळे पलाश मुच्छल आणि त्यांच्या कुटुंबीयांना थोडा दिलासा मिळाला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेला हा आदेश व्यावसायिक वाद आणि वैयक्तिक प्रतिष्ठेच्या रक्षणासाठी महत्त्वाचा मानला जात आहे. आता विज्ञान मानेकडून भविष्यात कोणतीही बदनामी होणार नाही, हे सुनिश्चित करण्यासाठी न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिले आहेत.

# चित्रपटातील 'रंगा' आठवतो का? विष, काळी जादू तर कधी... भावानेच रचला हत्येचा कट

चित्रपटात दिसणारा खलनायक अनेकदा फक्त पडद्यापुरता असतो, पण काही कलाकारांचे खरे आयुष्य त्याहून अधिक नाट्यमय असते. अनिल कपूरच्या ङ्गछूरङ्गफ सिनेमात रंगा नावाचा निर्दयी गुंड प्रेक्षकांनी पाहिला आणि हा चेहरा अनेकांच्या लक्षात राहिला. ही भूमिका साकारणारा अभिनेता म्हणजे पोन्नम्बलम. पडद्यावर भयानक दिसणारा हा कलाकार प्रत्यक्ष आयुष्यात मात्र मोठ्या संकटातून गेला आहे. त्याच्या आयुष्यात घडलेल्या घटनांनी चाहत्यांनाही धक्का दिला. स्वतः कलाकाराने एका मुलाखतीत केलेल्या खुलाशांनंतर त्याच्या जीवनातील काळोख समोर आला.

कुटुंबातील वाद आणि जीवघेणा कट


पोन्नम्बलमने सांगितले की त्यांचे कुटुंब मोठे होते. वडिलांच्या ४ पत्नी आणि एकूण ११ मुले अशी परिस्थिती होती. काही काळ त्याचा सावत्र भाऊच त्याचा व्यवस्थापक म्हणून काम करत होता. त्याच दरम्यान अचानक त्याची प्रकृती खालावली. डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर शरीरात विषारी घटक आढळले. अभिनेत्याच्या म्हणण्यानुसार, त्याच्या पेयामध्ये विष मिसळले गेले होते आणि त्यामुळे किडनीवर गंभीर परिणाम झाला.

काळी जादूचा धक्कादायक प्रसंग

एक रात्री झोप न लागल्याने तो बाहेर गेला असता त्याला संशयास्पद हालचाल दिसली. थोड्या अंतरावर त्याचा सहाय्यक आणि भाऊ काहीतरी करत होते. तिथे जमिनीत खड्डा खोदलेला होता. त्यात त्याचे कपडे, एक बाहुली आणि धागे ठेवलेले दिसले. दुसऱ्या दिवशी चौकशी केल्यावर त्याला धक्कादायक माहिती मिळाली. त्याच्या प्रसिद्धीचा मत्सर करून त्याला हानी पोहोचवण्याचा प्रयत्न केल्याचे उघड झाले. या घटनेमुळे अभिनेता मानसिकदृष्ट्या हादरला होता.

तब्येत बिघडली आणि अफवा पसरल्या

काही काळानंतर त्याची किडनी निकामी झाल्याची बातमी समोर आली. उद्योगात विविध चर्चा सुरू झाल्या. काहींनी त्यामागे व्यसन कारणीभूत असल्याचेही सांगितले. मात्र अभिनेत्याने स्पष्ट केले की ते कारण नसून विषबाधेमुळेच आरोग्य बिघडले. उपचारांनंतर त्याची प्रकृती हळूहळू सुधारली.पुन्हा मोठ्या पडद्यावर पुनरागमन अत्यंत कठीण काळातून गेल्यानंतरही पोन्नम्बलमने हार मानली नाही. त्याने लहान वयात काम सुरू केले होते आणि आजपर्यंत १५०० पेक्षा अधिक चित्रपटांमध्ये काम केले आहे. काही काळ विश्रांती घेतल्यानंतर तो पुन्हा अभिनय क्षेत्रात सक्रिय झाला आहे. ४ वर्षांच्या अंतरानंतर तो नव्या चित्रपटातून प्रेक्षकांसमोर येणार आहे. पडद्यावर खलनायक असला तरी प्रत्यक्ष आयुष्यात संकटांवर मात करणारा हा कलाकार चाहत्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.






# अमृता फडणवीसांचं नवं गाणं रिलीज

महादेव-ला समर्पित असलेला सण महाशिवरात्री येत्या रविवारी १५ फेब्रुवारीला साजरी करण्यात येणार आहे. महाशिवरात्रीनिमित्त अमृता फडणवीस यांचं नवं गाणं यूट्यूबवर रीलीज करण्यात आलंय. टी-सीरिज प्रस्तुत, भावस्पर्शी अमृता फडणवीस त्यांचं नवं भक्तिगीत शंभू रे सोशल मीडियावर व्हायरल झालं आहे. भगवान शिवजींना अर्पण केलेले एक हृदयस्पर्शी भजन असून भक्तीच्या मुळाशी रुजलेले आणि मनापासूनच्या संगीत अभिव्यक्तीने अधिक उंचावलेले हे गीत शिवभक्तीचा कालातीत सार पकडते आणि शांतता, सामर्थ्य आणि आध्यात्मिक स्थैर्य जागवते, असं म्हणायला हरकत नाही. या भजनाची शब्द-रचना श्रीजन यांनी लिहिलेली असून संगीत प्रसिद्ध संगीतकार मॉन्टी शर्मा यांचं आहे. या भजनासोबत राजीव वालिया दिग्दर्शित एक अत्यंत शांत, दिव्य असा संगीत व्हिडीओही सादर केला आहे. ज्यामध्ये अमृता फडणवीस दिव्यता, कृपा आणि मनापासूनच्या भक्तिभावाने हे गीत सादरीकरण करत आहे. ज्यामुळे श्रोते आणि प्रेक्षकांसाठी हा अनुभव ऐकण्यासोबतच पाहण्यासही एक संपूर्ण आध्यात्मिक अनुभूती देणारा ठरणार आहे. त्याच्या आत्मस्पर्शी धून आणि ध्यानमग्न ऊर्जेसह, हे भजन भक्तांना श्रद्धेत समर्पित होण्यासाठी आणि भगवान शिवाशी अधिक खोल नाते जोडण्यासाठी उत्तम मानले जातेय.

**अमृता फडणवीस या गाण्याबद्दल** म्हणाल्यात की, शिव माझ्या श्रद्धेचा फक्त एक भाग नाही तर ती एक भावना आहेत. 'शंभू रे' हे माझं त्यांच्याप्रती असलेलं प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचं माध्यम आहे. प्रत्येक वेळी मी महादेवासाठी गाते, तेव्हा मला असं वाटतं की मी थेट त्यांच्याशी बोलतेय. व्हिडीओचं शूटिंग करतानाही मला असं वाटलंच नाही की मी परफॉर्म करत आहे. तो खरोखर भक्ती आणि समर्पणाचा क्षण वाटत होता. मला आशा आहे की हे भजन आणि त्याचे दृश्य, जे ऐकतील आणि पाहतील त्यांच्या सर्वांना तसंच शांततेचं अनुभूती देतील, जशी शिवाची उपस्थिती मला शांतता देते.

अमृता फडणवीस यांची अनेक गाणी आजपर्यंत प्रसिद्ध झाली आहे. या भजना-तून त्यांनी भक्तिसंगीतही प्रवेश केला आहे. दरम्यान शंभू रे आता सर्व प्रमुख स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे, आणि त्याचा अधिकृत संगीत व्हिडीओ टी-सीरिजच्या यूट्यूब चॅनेलवर एक्सक्लुझिव्ह स्वरूपात पाहता येईल.





# मराठवाड्याच्या आतिथ्य सुविधांना बळकटी देत 'एनराइज बाय सयाजी'चे लातूरच्या एमआयडीसी परिसरात उद्घाटन

### लातूरमधील 'एनराइज बाय सयाजी'मध्ये ३० खोल्या, प्रशस्त बँक्वेट हॉल्स आणि आधुनिक भोजन व्यवस्था औद्योगिक पट्ट्याच्या मध्यवर्ती ठिकाणी समकालीन बिझनेस हॉस्पिटॅलिटीचा नवा अनुभव

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरातील वाढत्या औद्योगिक 'ओल्ड एमआयडीसी' परिसरात 'एनराइज बाय सयाजी लातूर'ने आपली सेवा सुरू केली आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा प्रदेशातील आतिथ्य क्षेत्रासाठी हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. ३० खोल्यांचे हे हॉटेल लातूरला देशातील वेगाने विकसित होणाऱ्या टियर-२ शहरांमध्ये स्थान मिळवून देणाऱ्या औद्योगिक आणि व्यावसायिक पट्ट्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सज्ज आहे. २०११ च्या जनगणनेनुसार २४.५४ लाख लोकसंख्या असलेल्या लातूर जिल्ह्याने मराठवाड्यातील एक महत्त्वाचे व्यावसायिक केंद्र म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे.

देशातील प्रमुख सोयाबीन व्यापार केंद्रांपैकी एक असलेले लातूर तसेच ११ सहकारी साखर कारखान्यांमुळे महाराष्ट्राची साखर पट्टी म्हणूनही ओळखले जाते. या मजबूत औद्योगिक पायाभूत सुविधांमुळे दर्जेदार व्यावसायिक आतिथ्य सेवांची सातत्यपूर्ण मागणी निर्माण झाली आहे.

'एनराइज बाय सयाजी लातूर' मध्ये व्यवसाय व विरंगुळ्यासाठी प्रवास करणाऱ्या पाहुण्यांसाठी तीन श्रेणींमध्ये एकूण ३० खोल्यांची सुविधा उपलब्ध आहे-१८ डिलक्स रूम्स, ९



एक्झिक्युटिव्ह रूम्स आणि ३ प्रीमियम एक्झिक्युटिव्ह रूम्स. प्रत्येक खोली आधुनिक सुविधा आणि आरामदायी रचनेने सज्ज आहे.

याशिवाय, येथे विविध आकारांचे चार प्रशस्त बँक्वेट हॉल्स उपलब्ध असून ते बोर्ड मिटिंग्स, प्रशिक्षण सत्रे, मोठ्या परिषदांपासून सामाजिक समारंभांपर्यंत सर्व कार्यक्रमांसाठी उपयुक्त आहेत. 'ज्वेल' हा सर्वात मोठा हॉल थिएटर शैलीत सुमारे ७०० पाहुण्यांची क्षमता असलेला आहे. 'सॉलिटेअर' मध्यम आकाराच्या कार्यक्रमांसाठी, 'क्रिस्टल' कॉर्पोरेट बैठका आणि समारंभांसाठी, तर 'कनेक्ट' हा छोट्या चर्चांसाठी सुसज्ज बोर्डरूम आहे.

निवास आणि कार्यक्रम सुविधांना पूरक म्हणून 'मोमेंट्' आणि 'होरायझन' ही दोन मल्टी-क्युजिन रेस्टॉरंट्स उपलब्ध असून, निवासी पाहुणे, व्यावसायिक प्रवासी आणि स्थानिक खाद्यप्रेमींसाठी आधुनिक भोजनाचा अनुभव देतात. लातूर हे आमच्या धोरणात्मक विस्तार दृष्टीकोनाशी सुसंगत असे उच्च क्षमतेचे बाजारपेठ आहे. मराठवाडा प्रदेशात आमची "Yours Truly' सेवा परंपरा आणत शहराच्या विकसित होत असलेल्या आतिथ्य गरजा पूर्ण करण्यासाठी Enrise by Sayaji, Latur ची रचना करण्यात आली आहे, असे सयाजी हॉटेल्सचे असोसिएट जनरल मॅनेजर श्री. राजेंद्र जोशी यांनी सांगितले.



गर्जे सोलर इन्फ्राचे व्यवस्थापकीय संचालक श्री. मयूर गर्जे म्हणाले, लातूर जिल्ह्याचे व्यापारी केंद्र म्हणून झालेले परिवर्तन आम्ही प्रत्यक्ष अनुभवले आहे.

या गतिमान व्यावसायिक परिसंस्थेसाठी दर्जेदार आतिथ्य सुविधा निर्माण करण्याची संधी आम्ही ओळखली. सयाजी हॉटेल्ससोबतच्या भागीदारीमुळे आमच्या शहरात जागतिक दर्जाच्या सुविधा आणि सेवा मानके आणता आली आहेत. ओल्ड एमआयडीसी परिसरात स्थित असल्यामुळे हॉटेलला प्रमुख औद्योगिक वसाहती आणि वाहतूक केंद्रांशी उत्तम जोडणी लाभली आहे.

लातूर रेल्वे स्थानकापासून हे हॉटेल सुमारे ३ किमी अंतरावर असून सोलापूर विमानतळापासून १२० किमी अंतरावर आहे, ज्यामुळे उत्पादन व प्रक्रिया उद्योगांशी संबंधित व्यावसायिक प्रवाशांसाठी सोयीस्कर प्रवासाची सुविधा उपलब्ध होते. 'एनराइज बाय सयाजी लातूर'चे उद्घाटन हे ब्रँडच्या उच्च क्षमतेच्या विकास बाजारपेठांमध्ये विस्तार करण्याच्या सातत्यपूर्ण धोरणाचे प्रतीक आहे. उदयोन्मुख व्यावसायिक शहरांच्या आतिथ्य गरजा पूर्ण करताना लातूरला व्यापार, कार्यक्रम आणि आधुनिक शहरी अनुभवांचे केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी हे हॉटेल महत्त्वाची भूमिका बजावेल.

## महाशिवरात्री उत्सवातील 'बाबा महाकाल की शाही सवारी' भव्य शोभा यात्रा ठरणार लातूरकरांसाठी अविस्मरणीय

### महाशिवरात्री उत्सवात लातूरकरांनी सहभागी होण्याचे आयोजकांचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** श्री महाकालेश्वर चॅरिटेबल ट्रस्ट संचलित महाकालेश्वर प्रतिष्ठानच्यावतीने लातूर महाशिवरात्री उत्सव २०२६ प्रतिवर्षाप्रमाणे याही




वर्षी आयोजित करण्यात आला आहे. रविवार, (दि. १५) फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीचे औचित्य साधून बाबा महाकाल की शाही सवारी भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. महाशिवरात्री उत्सवानिमित्त राजीव गांधी चौक लातूर येथे सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व उपक्रमात लातूरकरांनी उत्साहात सहभागी व्हावे असे आवाहन महाकालेश्वर प्रतिष्ठान, महाशिवरात्री महोत्सव समिती च्यावतीने करण्यात आले आहे.

महाशिवरात्री उत्सवाची सुरुवात रविवार दिनांक १५ फेब्रुवारी रोजी होणार असून कार्यक्रमाची रूपरेखा पुढीलप्रमाणे असणार आहे. सकाळी १० वाजता मान्यवरांच्या हस्ते आरती करून महाशिवरात्री उत्सवाची सुरुवात करण्यात येणार आहे. सकाळी ११ वाजता रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. सायंकाळी ४ वाजता बाबा महाकाल की शाही सवारी या शोभायात्रेस राजीव गांधी चौक येथून सुरुवात होणार आहे तर सोहळ्याची सांगता श्री वैजनाथ महादेव मंदिर (तळ्यातील महादेव) येथे होणार आहे.

बाबा महाकाल पालखी सोहळा दरम्यान विविध सांस्कृतिक सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असून यामध्ये भव्य ढोल पथक, भजनी मंडळी, डमरू व झांज पथक, हलगी पथक, लेझीम पथक, आकर्षक लाईट शो, अवंतिकानाथ अघोरी ग्रुप या वतीने अघोरी नृत्य, शालेय विध्यार्थी देखावा सादर करण्यात येणार आहे. महाशिवरात्री उत्सवाच्या शेवटी तळ्यातील महादेव मंदिर येथे भव्य आतिषबाजी करुन महाशिवरात्री उत्सव २०२६ ची सांगता होणार आहे.

श्री महाकालेश्वर चॅरिटेबल ट्रस्ट संचलित महाकालेश्वर प्रतिष्ठानच्यावतीने लातूर महाशिवरात्री उत्सवात लातूरकरांनी उत्साहात सहभागी होऊन सर्व लातूरकरांसाठी आकर्षक ठरणारा बाबा महाकाल शाही सवारी भव्य शोभा यात्रा सोहळा यशस्वी करावा असे आवाहन महाकालेश्वर प्रतिष्ठान, महाशिवरात्री महोत्सव समिती च्यावतीने करण्यात आले आहे.

## बौद्ध समाजातील सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक संस्थांसाठी अनुदान योजना

**लातूर/प्रतिनिधी :** अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता बौद्ध समाजातील सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक कार्य राबविणाऱ्या संस्थांना पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे. इच्छुक संस्थांनी विहित नमुन्यातील अर्ज सर्व आवश्यक कागदपत्रांसह लातूर जिल्हा नियोजन अधिकारी कार्यालयाकडे २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत सादर करावेत, असे जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे

राज्यातील धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत आणि संस्थेमध्ये ५१ टक्क्यांपेक्षा अधिक बौद्ध समाजातील विश्वस्त, सदस्य असलेल्या संस्थांसाठी महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता ''बौद्ध समाजातील सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक कार्य राबविणाऱ्या संस्थांना पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना'' राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत पात्र संस्थांना सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सामाजिक कार्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारणीसाठी शासनाकडून आर्थिक मदत देण्यात येणार आहे. या योजनेचा उद्देश राज्यातील बौद्ध समाजातील संस्थांचा सर्वांगीण विकास साधणे हा आहे. संस्था राज्यातील धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असणे आणि संस्थेतील ५१ टक्क्यांपेक्षा अधिक विश्वस्त तथा सदस्य बौद्ध समाजातील असणे आवश्यक आहे.

योजनेबाबतचे सविस्तर निकष, अटी व शर्ती महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. अविवि-२०२४/प्र.क्र.७५/१५/ का.६, दिनांक ०७ ऑक्टोबर २०२४ मध्ये उपलब्ध आहेत.

## बोरगाव काळे येथील पाडुरंग देंडे या शेतकऱ्यास तब्बल २५ वर्षांपासून शेतरस्ताच नाही !

### पालकमंत्र्यानी तहसीलदार व उपविभागीय अधिकाऱ्यांना झापले!

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर तालुक्यातील बोरगाव काळे येथील शेतकरी पांडुरंग देडे यांची गट क्र. ३३२ मध्ये चार एकर शेत जमीन आहे. मात्र या शेताला जाण्यासाठी शेत रस्ता मिळावा यासाठी पांडुरंग देडे यांनी तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, पालकमंत्री यांच्याकडे वारंवार अर्ज विनंत्या करूनही अद्याप पर्यंत रस्ता मिळालेला नाही. त्यासाठी लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांना ऑगस्ट २०२५ मध्ये निवेदन दिले होते. आठ दिवसात काम होईल म्हणाले होते. मात्र तहसीलदार आणि उपविभागीय अधिकाऱ्यांनी कोणतीच दखल घेतली नाही. परवा फेब्रुवारी महिन्यात पालकमंत्री लातूरला आले असताना पुन्हा शेतकरी पांडुरंग देडे हे त्यांना विश्रामगृहात



जाऊन भेटले. आणि आपली व्यथा सांगितली. तेव्हा पालकमंत्र्यांनी तहसीलदार व उपविभागीय अधिकाऱ्यांना चांगलेच फैलावर घेतले. एका शेतकऱ्याची २५ वर्षांपासूनची समस्या प्रशासनाला सोडवता येत नाही. ही गंभीर बाब असल्याचे सांगून तात्काळ हे प्रकरण निकाली काढावे, असे निर्देश दिले आहेत.

५ जानेवारी रोजी तहसीलदारांच्या आदेशाने भूमी अभिलेखचे भूमापक आढाव, तलाठी आशुतोष कांबळे,मंडल अधिकारी भुजबळ हेशेतीची हद्द व खुणा करून देण्यासाठी रोजी शेतावर आले. मात्र भुमापक आढाव हे पळून गेले. त्याबाबतचा पंचनामा मंडल अधिकाऱ्याकडून करण्यात आला. शेतत्यासाठी नोटीसा देऊनही आतापर्यंत पाचवेळा असा प्रकार घडला आहे. प्रशासनाकडून ठोस कार्यवाही केली जात नाही, असे शेतकरी पांडुरंग देडे यांनी पालकमंत्र्यांना सांगितले.

प्रत्येक वेळी तहसीलदारांच्या आद- शाने मंडल अधिकऱ्या मार्फत नोटीसा देऊनही गैरहजर राहणे आणि पोलीसांचे सहकार्य मिळत नाही.. महसूल विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी टाळाटाळ करत आहेत. माझ्या शेताचा शेतरस्ता मिळवून द्यावा, अशी मागणी शेतकरी पांडुरंग देडे यांनी निवेदनद्वारे पालकमंत्र्यांकडे केली आहे. शेत रस्ता न मिळाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी पांडुरंग देडे यांनी दिला.

## श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचा सदिच्छा समारंभ

**लातूर/प्रतिनिधी** :येथील अभिनव मानव विकास संस्थाद्वारा संचालित श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा सदिच्छा समारंभ नुकताच उत्साहात पार पडला.

यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना विद्यालयात आपल्याला शिक्षणासोबतच जीवनात यशस्वी कसे व्हायचे ? याचेही शिक्षण मिळाल्याचे सांगितले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.अशोक गानू उपस्थित होते. यांच्या हस्ते डॉ. गानू यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर, सहसचिव सुभाष कासले, मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शालेय सराव परीक्षेमध्ये बक्षिसपात्र ठरलेल्या समर्थ कल्याण गिरवलकर , कु.समृद्धी वैभव पाटील, अथर्व संतोष मरे , साईनाथ अनिल चामे यांचा पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला. तसेच अभिनव गुणवंत विद्यार्थी पुरस्काराने समर्थ गिरवलकर, अथर्व मरे यांचाही डॉ. अशोक गानू यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी मनोगत व्यक्त करताना डॉ. अशोक गानू यांनी विद्यार्थ्यांना तुम्हाला तुमच्या मनाप्रमाणे चांगले शिक्षण मिळालं आहे. पण आजूबाजूला असे अनेकजण आहेत, ज्यांच्यात गुणवत्ता असूनही मनातल्या गोष्टी करायला मिळत नाहीत. अशी व्यक्ती तुम्हाला भेटेल तेव्हा त्या व्यक्तीला कमी लेखू नका. जमेल तसे साह्य करा. तुमच्यामध्ये एखादी कला असेल तर तिची जोपासना करा.

शाळेतील विविध अनुभव, इथं मिळालेलं ज्ञान, माहिती याचा विसर पडू देऊ नका असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना दहावी परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर यांनी यावेळी मनोगत व्यक्त करताना विद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांना सर्वंकष शिक्षण देण्याचे काम केले जाते. विद्यार्थ्यांना अभ्यासासोबतच जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी अग्रक्रमाने शिकवण्यात येत असल्याचे सांगितले.

## रेल्वे, होळी सण आणि उन्हाळी सुट्ट्यांमध्ये सोलापूर विभागातून धावणाऱ्या विशेष गाड्यांची सेवा सुरू ठेवणार

**सोलापूर/प्रतिनिधी :**प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी होळी उत्सव आणि उन्हाळी सुट्ट्यांमध्ये सोलापूर विभागातून धावणाऱ्या विशेष गाड्यांची सेवा रेल्वे सुरू ठेवणार आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :

साप्ताहिक गाड्या

* ट्रेन क्रमांक ०१४३५ सोलापूर-लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई साप्ताहिक विशेष २४.०२.२०२६ पर्यंत दर मंगळवारी धावणार होती. ती आता १४.०७.२०२६ पर्यंत धावणार आहे.
* ट्रेन क्रमांक ०१४३६ लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई-सोलापूर साप्ताहिक विशेष २५.०२.२०२६ पर्यंत दर बुधवारी धावणार होती. ती आता १५.०७.२०२६ पर्यंत धावणार आहे.
* ट्रेन क्रमांक ०१४७७ सोलापूर-अनकापल्ले साप्ताहिक विशेष गाडी २७.०२.२०२६ पर्यंत धावणार होती. ती आता दर शुक्रवारी १०.०७.२०२६ पर्यंत धावणार आहे.
* ट्रेन क्रमांक ०१४७८ अनकापल्ले-सोलापूर साप्ताहिक विशेष गाडी २७.०२.२०२६ पर्यंत धावणार होती. ती आता दर शनिवारी ११.०७.२०२६ पर्यंत धावणार आहे.दैनिक गाड्या २८.०२.२०२६ पर्यंत दररोज धावण्यासाठी अधिसूचित केलेल्या खालील दैनिक गाड्या १५.०७.२०२६ पर्यंत सुरू ठेवण्यात आल्या आहेत
* ट्रेन क्रमांक ०१४६१/०१४६२ सोलापूर-दौंड अनारक्षित दैनिक विशेष
* ट्रेन क्रमांक ०१४६५/०१४६६ सोलापूर-कलबुरगि अनारक्षित दैनिक विशेष
* ट्रेन क्रमांक ०१४८७/०१४८८ हडपसर-हरंगुळ अनारक्षित दैनिक विशेष

वरील गाड्यांच्या वेळा, रचना आणि थांब्यांमध्ये कोणताही बदल होणार नाही.

आरक्षण आणि बुकिंग: विशेष शुल्कावर विशेष गाड्यांच्या सततच्या फेऱ्यांसाठी सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in वेबसाइटवर आरक्षण उपलब्ध असेल.

अनारक्षित डब्यांसाठी बुकिंग स्थानकांवर बुकिंग काउंटर आणि रेलवन ॲपद्वारे देखील करता येते. प्रवाशांना गैरसोय टाळण्यासाठी वैध तिकिटांसह प्रवास करण्याची विनंती करण्यात येत आहे.

या विशेष गाड्यांच्या थांब्यांच्या तपशीलवार वेळेसाठी कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा RailOne ॲप किंवा NTES ॲप डाउनलोड करा.

## ग्रंथालय कर्मचारी विकास परिषद कार्याध्यक्षपदी श्रीधर स्वामी महिला आघाडी अध्यक्षपदी वैशाली दुरूगकर यांची निवड



**लातूर/प्रतिनिधी :** सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेची राज्यस्तरीय बैठक महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष सदाशिव बेडगे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी लातुरात उत्साहात पार पडली. या बैठकीत परिषदेच्या कार्याध्यक्षपदी श्रीधर स्वामी यांची तर महिला आघाडीच्या अध्यक्षपदी सौ. वैशाली दुरूगकर यांची निवड करण्यात आली.

सदर बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणे व आपल्या प्रलंबित प्रश्नांसाठी न्याय मिळवून घेणे, तसेच सुकाणू समिती अर्थात कोअर कमिटीबाबत चर्चा झाली, यामध्ये संपूर्ण कार्यकारी मंडळ हेच कोअर कमिटीचे सदस्य राहतील, असे सर्वानुमते ठरले. संघटनेत नविन पदमान्यता घेऊन राज्य महिला अध्यक्ष व कार्याध्यक्ष हे पद भरण्याचे निश्चित करण्यात आले. यावेळी



महिला आघाडीच्या राज्यस्तरीय अध्यक्ष म्हणून सौ. वैशाली दुरुगकर यांना तसेच कार्याध्यक्ष म्हणून श्रीधर स्वामी यांना नेमणूक पत्र देण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मानही करण्यात आला.

ही बैठक अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. या बैठकीकडे राज्यातील सर्व ग्रंथालय कर्मचारी व पदाधिकारी यांचे लक्ष लागले होते. बैठकीसाठी राज्याचे अध्यक्ष सदाशिव बेडगे ,सिद्राम मुद्देबिहाळ, वसंत धोत्रे, रामचंद्र वग्गे, धोंडीराम जेऊरकर, राज्य संघटक विद्यासागर हणमंते, मराठवाडा संघटक निळकंठ होनमोडे, मराठवाडा कार्याध्यक्ष मनोहर गायकवाड, परिषदेचे लातूर जिल्हा उपाध्यक्ष सुर्यकांत जाधव, लातूर जिल्हा सचिव संतोष करमले, बालसिंगप्पा ओपळे , नागनाथ नागरगोजे, सौ.नागेश्वरी पांचाळ निवृत्ती सुर्यवंशी, रामानंद स्वामी, दगडू गरड,चंद्रकांत माने यासह मान्यवर उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.


शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# प्राथमिक आरोग्य केंद्राकडे दुर्लक्ष,रूग्णांची हेळसांड

**नळेगाव/अजगर मजकुरी :** चाकूर तालुक्यातील नळेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राकडे दीर्घकाळापासून सुरू असलेल्या प्रशासनाच्या आणि लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. केंद्रातील कर्मचाऱ्यांची कमतरता, इमारतींची दुरावस्था, मूलभूत सुविधा नसणे आणि आवश्यक आरोग्य सेवा वेळेत न मिळणे यामुळे उपचारासाठी येणाऱ्या नागरिकांत तीव्र नाराजी पसरली आहे.

१९८४ पासून प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत आहे. या केंद्राअंतर्गत ३५ गावांचासमावेश आहे. यामध्ये नऊ उपकेंद्र असून, या गावाव्यतिरिक्त इतर १५ गावांतील रुग्णही उपचारासाठी येथे येतात. ३५ गावांची लोकसंख्या ७५ हजार असून, १५ गावांची लोकसंख्या मिळून जवळपास दीड लाख लोकसंख्येचा भार या प्राथमिक आरोग्य केंद्रावर आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेवक, सेविका अनेक पदे रिक्त आहेत.दैनंदिन आरोग्य सेवा कोलमडल्या असून, रुग्णांना वेळेत उपचार मिळत नाहीत. केंद्रांची जीर्णावस्था व गैरसोय होत आहे. गावातील आरोग्य केंद्र अत्यंत जीर्ण अवस्थेत असून इमारतीची पडझड, मोडकळीला आलेले खोलीचे छप्पर, तुटलेली खिडकी-दारे यामुळे रुग्णांना सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

कर्मचारी संख्या कमी व अनेकदा कर्मचारी अनुपस्थित असल्याने नागरिकांना लातूरला उपचारासाठी धाव घ्यावी लागत आहे. महत्वाच्या सेवांचा अभाव या प्राथमिक आरोग्य केंद्रात शस्त्रक्रिया सेवा पूर्णपणे ठप्प असून, इतर विशेष आवश्यक सेवा देखील उपलब्ध नाहीत. गर्भवती महिला, आपत्कालीन रुग्ण आणि वृद्ध नागरिकांना उपचारासाठी तासनतास प्रवास करावा लागतो.

**दररोज अडीचशे ते तीनशे रुग्णांची ओपीडी**

नळेगाव येथे रोज अडीचशे ते तीनशे रुग्ण तपासणीसाठी येतात. दर महिन्याला २५ ते ३० प्रसूती, तर २० कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया केल्या जातात. महिन्याला पोलिस केसमधील ३० ते ४०, अपघातातील ८० ते १०० रुग्ण उपचारासाठी येतात. तर १५ ते २० शवविच्छेदन होतात. रुग्णालयाकडून शासनाने दिलेले सर्व उद्दिष्ट पूर्ण केले जाते. आरोग्य केंद्रात सध्या तीन वैद्यकीय अधिकारी कार्यरत असून, ग्रामीण रुग्णालय निर्माण झाल्यास रुग्णांना दर्जेदार सुविधा मिळण्यास मदत होणार आहे.

**धोरणात्मक त्रुटींचा परिणाम**

शासनाकडून ग्रामीण आरोग्य व्यवस्थेसाठी अनेक योजना आहेत. मात्र त्या प्रत्यक्षात अमलात येत नसल्याने आरोग्य सेवा केवळ कागदावरच मर्यादित असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. केंद्रात शौचालय, वॉशरूम, स्वच्छ पिण्याचे पाणी यांसारख्या मूलभूत सुविधांचादेखील अभाव प्रकर्षाने जाणवतो. गावातील नागरिकांनी या सर्व समस्यांवर तातडीने उपाययोजना कराव्यात. केंद्रातील रिक्त पदे तत्काळ भरावीत आणि आरोग्य केंद्र सक्षमपणे सुरू करावे, अशी मागणी प्रशासन व लोकप्रतिनिधींकडे केली आहे.

**ग्रामीण रुग्णालय भाषणातच**

नळेगावसह परीसरातील रुग्ण, गरोदर माता, कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया आदीसाठी या प्राथमिक आरोग्य केंद्रात येतात. लोकसंख्येच्या प्रमाणात याठिकाणी ग्रामीण रुग्णालय होणे गरजेचे आहे. ग्रामस्थांकडून गेल्या अनेक वर्षांपासून याची मागणी आहे ; मात्र लोकप्रतिनिधी निवडणूकीच्या प्रचार सभेत, नेते येथे आयोजित कार्यक्रमात आपल्या भाषणात याठिकाणी ग्रामीण रुग्णालय करण्यात येईल असे सांगतात. प्रत्यक्षात अद्याप याबाबत काहीही झाले नाही.

---------

*नळेगाव लोकसंख्येने मोठे गाव आहे. येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात परीसरातील रुग्ण मोठ्या संख्येने येतात. या केंद्रात सुविधा नसल्याने पुढील उपचारासाठी लातूर गाठावे लागते. अनेकांना वेळेत उपचार न मिळाल्याने जीव गमवावा लागला आहे. लोकप्रतिनिधी व वरीष्ठांनी याकडे लक्ष द्यावे.*

***– शंकर पाटील, नळेगाव.***

---------




प्राथमिक आरोग्य केंद्रात सर्व सुविधा उपलब्ध नसल्याने वयोवृद्ध महिला, गरोदर महिला यांना योग्य उपचार मिळत नाहीत. सोनोग्राफी सारख्या सुविधा असणे गरजेचे आहे. ग्रामीण रुग्णालय झाले तर सुविधा मिळतील.यासाठी लोकप्रतिनिधीनी ग्रामीण रुग्णालय केवळ भाषणात न सांगता प्रत्यक्षात आणावे. – अनिता आदमाने,नळेगाव.

# पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे निर्देश व मार्गदर्शनाखाली भरती प्रक्रियेला डिजिटल बळ

## पारदर्शक पोलीस भरतीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील पोलीस भरती प्रक्रिया पूर्णतः पारदर्शक, निष्पक्ष व गुणवत्ताधारित पद्धतीने पार पाडण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या निर्देश व मार्गदर्शनाखाली अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात येत आहे. महाराष्ट्र पोलीस यांच्या धोरणानुसार डिजिटल प्रणालीचा अवलंब करून भरती प्रक्रियेत पारदर्शकतेचा नवा आदर्श निर्माण करण्यात आला आहे.

**बायोमेट्रिक प्रणाली चा वापर**

उमेदवारांची अचूक पडताळणी भरती प्रक्रियेच्या प्रारंभी प्रत्येक उमेदवाराची बायोमेट्रिक नोंदणी (फिंगरप्रिंट रेकग्निशन) करण्यात येते. मैदानी चाचणीवेळी नोंदवलेली बायोमेट्रिक माहिती लेखी परीक्षेदरम्यान पुन्हा पडताळली जाते यामुळे मैदानी चाचणी देणारा उमेदवार आणि लेखी परीक्षेला उपस्थित राहणारा उमेदवार तोच असल्याची खात्री संगणकीय पद्धतीने केली जाते त्यामुळे गैर प्रकारांना पूर्णतः आळा बसणार आहे.



RFID (Radio Frequency Identification) चिप प्रणाली.

धावण्याच्या चाचणीत शंभर टक्के अचूकता आणण्यासाठी मैदानी धाव चाचणीदरम्यान प्रत्येक उमेदवाराच्या पायाला ठऋखऊ चिप स्ट्रॅपद्वारे सुरक्षितपणे बांधली जाते. सदर ठऋखऊ चिप मुळे अचूक वेळ नोंद. धाव चाचणी सुरू होताच सेन्सर प्रणालीद्वारे उमेदवाराने पूर्ण केलेल्या अंतराची सेकंदागणिक डिजिटल नोंद होते. मानवी हस्तक्षेप टाळल्यामुळे वेळ मोजण्यात कोणतीही चूक राहत नाही.

फेऱ्यांची स्वयंचलित मोजणी. लांब पल्ल्याच्या धावण्यात प्रत्येक फेरीची नोंद स्वयंचलितपणे केली जाते.

फसवणूक प्रतिबंध.

प्रत्येक RFID चिप उमेदवाराच्या विशिष्ट नोंदणी क्रमांकाशी जोडलेली असल्याने गैर प्रकारांना पूर्णतः आळा बसतो.

सीसीटीव्ही व डिजिटल नियंत्रण कक्ष.

भरती प्रक्रियेच्या संपूर्ण परिसरात उच्च क्षमतेचे उउढत कॅमेरे बसविण्यात आले असून, नियंत्रण कक्षातून थेट निरीक्षण केले जाते. प्रत्येक टप्प्याचे व्हिडिओ रेकॉर्डिंग पारदर्शकतेसाठी ठोस पुरावा उपलब्ध आहे. यामुळे प्रक्रिया अधिक विश्वासार्ह व शंकामुक्त बनली आहे.

=९ संगणकीकृत डेटा व्यवस्थापन व त्वरित निकाल.सर्व उमेदवारांची माहिती, गुणांकन, वेळ नोंदी व निकाल पूर्णतः संगणकीकृत प्रणालीद्वारे हाताळले जातात. त्यामुळे कसल्याही प्रकारची त्रुटीची शक्यता संपवून धाव चाचणी पूर्ण होताच वेळेची त्वरित माहिती उपलब्ध होते.

पारदर्शकतेचा दृढ संकल्प.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्हा पोलीस दलाने आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने पोलीस भरती प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष व गुणवत्ताधारित बनवली आहे. बायोमेट्रिक ओळख प्रणाली, ठऋखऊ तंत्रज्ञान, उउढत मॉनिटरिंग व संगणकीकृत डेटा व्यवस्थापन या सर्व उपाययोजनांमुळे भरती प्रक्रियेत गैरप्रकारांना पूर्णपणे आळा बसला असून लातूर पोलीस दलाची ही तंत्रज्ञानाधारित भरती प्रक्रिया भविष्यातील प्रशासनासाठी आदर्श ठरत आहे.

# श्री सिध्देश्वर यात्रे निमित्त मंदिर परिसरातील काही ठिकाणच्या रोडवरील वाहतुक तात्पुरत्या स्वरुपात बंद

**लातूर/प्रतिनिधी:** लातुर शहरात दिनांक १५/०२/२०२६ रोजी पासून श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवालयाच्या ७३ व्या महाशिवरात्री निमित्त यात्रा भरते व मोठया प्रमाणात उत्साहाने साजरा होते. सदर यात्रे करीता लातूर शहरातून, जिल्हयातून व इतर जिल्हयातून नागरिक मोठया प्रमाणात येतात. यात्रेला येणारे वाहनांमुळे सदर परिसरात वाहतुक कोंडी निर्माण होवू नये म्हणून मंदिर परिसरातील खालील ठिकाणाहून मंदिराकडे येण्यासाठी वाहनांवर बंदी घालणे आवश्यक आहे.

लोकांच्या दळणवळणानिमीत्त त्यांना विविक्षीत ठीकाणी पोहचणेसाठी सदरची अडचण लक्षात घेता दिनांक १५/०२/२०२५ रोजीचे ००.०१ ते यात्रा संपेपर्यंत खालील मार्गावर वाहतुक तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात येत आहे. दिनांक १५/०२/२०२५ रोजीचे ००.०१ ते यात्रा संपेपर्यंत वाहतुकीस बंद असणारे मार्ग १) रिंग रोड मार्गे मळवटी चौकाकडून मंदिर परिसरात यात्रेकडे येणारे सर्व वाहने (दुचाकी वगळून) हे मळवटी चौकापर्यंत येतील तेथून पुढे येण्यासाठी प्रतिबंध करावा

२) गांधी चौक, हत्ते कॉर्नर, सिध्देश्वर चौक मार्गे मंदिर परिसरात यात्रेकडे येणारे सर्व वाहने (दुचाकी वगळून) हे सिध्देश्वर चौकापर्यंतच येतील तेथून पुढे येण्यासाठी प्रतिबंध करावा

३) शाहु चौकाकडून ६० फुटी रोड, अब्दुल कलाम चौक मार्गे मंदिर परिसरात यात्रेकडे येणारे सर्व वाहने (दुचाकी वगळून) हे अब्दुल कलाम चौकापर्यंतच येतील तेथून पुढे येण्यासाठी प्रतिबंध करावा

४) बरकत नगर कडून मंदिर परिसरात यात्रेकडे येणारे सर्व वाहने (दुचाकी वगळून) हे बरकत नगर कॉर्नर पर्यंतच येतील तेथून पुढे येण्यासाठी प्रतिबंध करावा तरी सर्व नागरीकांनी उक्त आदेशाप्रमाणे वाहतुकीसाठी बंद असल्याचे घोषित करण्यात आलेल्या मार्गाचा वापर न करता पर्यायी मार्गाचा वापर करुन महानगरपालिका व पोलिस प्रशासनास सहकार्य करावे.

रोज वाचा ऑनलाईन
लातूर समाचार
www.latursamachar.com

# महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या लातूर विभागात ६५ शिकाऊ उमेदवारांची भरती

**लातूर/प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या लातूर विभागात सन २०२५-२०२६ मधील भाग २ सत्रासाठी वेगवेगळ्या व्यवसायासाठी ६५ शिकाऊ उमेदवारांची (प्रशिक्षणार्थी) पदे ऑनलाईन पध्दतीने भरली जाणार आहेत.

यामध्ये मोटार मेकॅनिक (यांत्रिक मोटारगाडी एमएमव्ही) ४१ पदे, मोटारगाडी साठाजोडारी (एमव्हीबीबी) (शिट मेटल वर्क्स) १३ पदे, मेकॅनिक टो इलेक्ट्रीकल न्ड इलेक्ट्रीशियन (विजतंत्री) ७ पदे, सांधाता (वेल्डर) गॅस न्ड ईलेक्ट्रीकल १, पदे आणि मेकॅनिक रेफ्रिजरेशन न्ड एअर कंडिशनर (प्रतिशन व वातानुकूलिकरण टेक्निशियन) १ पदे अशी एकूण ६५ पदे भरावयाची आहेत.

संबंधित व्यवसायातील दहावी पास, आय.टी. आय (एनसीव्हीटी) किंवा विहित व्यावसायात व्होकेशनल अभ्यासक्रम (एमएसबीएसव्हीईटी) पूर्ण केलेल्या, तसेच यांत्रिकी प्रवर्गातील अभियांत्रिकी पदवीधर, पदविका या पदांसाठी केवळ आयटीआय उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांनी सर्वप्रथम एनएपीएस वेब पोर्टलवरील www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर आणि अभियांत्रिकी पदवीधर, अभियांत्रिकी पदविकासाठी एनएटीएस-२.० पोर्टलवरील www.nats.education.in या संकेतस्थळावर १३ ते २२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत ऑनलाईन नोंदणी करून एमएसआरटीसी डिव्हिजन लातूर (MSRTC Division Latur) E001172700461 या आस्थापनेसाठी (Establishment) ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

ऑनलाईन नोंदणी केलेल्या उमेदवारांनी लातूर विभागीय कार्यालयात उपलब्ध करून दिलेले छापील अर्ज भरावेत. हे छापील अर्ज लातूर शहरातील जुना रेणापूर नाका येथील राज्य परिवहन लातूर विभागीय कार्यालय आस्थापना शाखा येथे शनिवार व रविवार वगळून २३ ते २८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत मिळतील व लगेच स्विकारले जातील. या अर्जासोबत (जीएसटी १८ टक्के सहित) खुल्या प्रवर्गाकरीता ५९० रुपये व मागासवर्गीयांसाठी २९५ रुपयेचा धनादेश किंवा आयपीओ (इंडियन पोस्टल ऑर्डर) एमएसआरटीसी फंड अकाऊंट लातूर (MSRTC Fund Account Latur) या नावाने अर्ज घेतेवेळी सोबत असणे आवश्यक आहे.

१३ ते २२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीनंतर ऑनलाईन नोंदणी करणाऱ्या उमेदवारांच्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही, असे अर्ज रद्द समजले जातील. अशा उमेदवारांना कार्यालयाचा छापील नमुन्यातील अर्ज देण्यात येणार नाही. जे उमेदवार २८ फेब्रुवारी, २०२६ रोजी वेळ दुपारी ३ वाजेपर्यंत कार्यालयाचे विहित नमुन्यातील अर्ज सादर करणार नाहीत, त्यांचा शिकाऊ उमेदवार भरतीसाठी विचार केला जाणार नाही, असे लातूर राज्य परिवहन विभाग नियंत्रक यांनी कळविले आहे.

## लक्ष्मण रेषा ..

स्पर्धात्मक या परिक्षा
लांघल्या लक्ष्मण रेषा
जीवघेण्या बने स्पर्धा
वेसणआवश्यकत्वेषा

मार्काची खैरात चाले
टक्क्यांची चढतेनशा
शंभर टक्क्यां खात्री
लालची बनली आशा

किती तेजीत आलाय
कोचिंगक्लासेस पेशा
शाळा ओसाड पडती
कसा छेद देतो उद्देशा

शर्यतीत अव्वलपाल्य
पालकांची वाढवे ईर्षा
मुखावर ताण तणाव
मुकलायं निर्मळ हर्षा

अंदाजचुकता जरासा
नसानसा भरे निराशा
भरकटून जाय उदिष्ट
स्वप्ने विकतो खग्राशा

मनातली मुर्ती विसरे
वेगळा रेखाटे नकाशा
आमंत्रण दे काळोखा
डोळे दिपलेत प्रकाशा

मार्कांचे मशिन बनावे
पाल्याचीबदलेमनिषा
व्यावहारिक युद्धामधे
हरवून बसेल जिगिषा

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# जयक्रांती सेमी इंग्लिश स्कूलचे आंतरराष्ट्रीय ओलंपियाड परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार

**लातूर/प्रतिनिधी:** जयक्रांती सेमी इंग्लिश स्कूल लातूर च्या इयत्ता पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय ओलंपियाड परीक्षेत घवघवीत यश संपादन केले त्याबद्दल त्यांचा सत्कार आदरणीय प्राचार्य प्रशांत घार यांच्या हस्ते संपन्न झाला यशस्वी विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल, सिल्वर मेडल,ब्रांझ मेडल,प्रमाणपत्र गुलाबपुष्प देवून गौरविण्यात आले. यशस्वी विद्यार्थी पुढीलप्रमाणे

श्रेया आदमाने - विज्ञान ओलंपियाड (ESO) - गोल्ड मेडल.

नंदनी इंगळे - गणित ओलंपियाड (EMO) गोल्ड मेडल, विज्ञान ओलंपियाड (ESO) सिल्वर मेडल.

नंदिनी राठोड - विज्ञान ओलंपियाड (ESO) गोल्ड मेडल, गणित ओलंपियाड (EMO) सिल्वर मेडल.

वर्ग सहावा -

वेदांत घोडके- विज्ञान ओलंपियाड (ESO) गोल्ड मेडल, गणित ओलंपियाड (एचज) सिल्वर मेडल.



अंकिता सूर्यवंशी - विज्ञान ओलंपियाड (ESO) सिल्वर मेडल, गणित ओलंपियाड (EMO) सिल्वर मेडल.

वर्ग सातवा -

अनन्या शिंदे - विज्ञान ओलंपियाड (ESO) - गोल्ड मेडल.

आरुष मळगे - विज्ञान ओलंपियाड (ESO) गोल्ड मेडल, गणित ओलंपियाड (एचज) सिल्वर मेडल.

ऋषिकेश पवार- विज्ञान ओलंपियाड (ESO) गोल्ड मेडल, गणित ओलंपियाड (EMO) गोल्ड मेडल.

रुद्राक्ष शिल्पकार - विज्ञान ओलंपियाड (ESO) गोल्ड मेडल, गणित ओलंपियाड (EMO) ब्रांझ मेडल.

वर्ग आठवा

सुचिता मोगरगे - इंग्रजी ओलंपियाड (EEO) गोल्ड मेडल, गणित ओलंपियाड (EMO) गोल्ड मेडल.

वर्ग नववा

अथर्व देशमाने - गणित ओलंपियाड (EMO) - गोल्ड मेडल.

अधिराज घोलप - विज्ञान ओलंपियाड (ESO) गोल्ड मेडल, गणित ओलंपियाड (EMO) गोल्ड मेडल.

रुतुजा पवार - विज्ञान ओलंपियाड (ESO) - गोल्ड मेडल. तसेच परीक्षेमध्ये अ श्रेणी प्राप्त विद्यार्थांना प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले.

या प्रसंगी पर्यवेक्षक तानाजी घाटके, परीक्षा विभाग प्रमुख विश्वनाथ सिंधीकुमठे,गिरीष रंदाळे, नंदकिशोर माळी,डॉ.गणपत माने, डॉ.सुशिल शिंदे,निता तांभाळे,संभाजी वारकड ,रामदास लातूरे, अमर येळंबकर, संगमेश्वर भेंडेगावे, रंजना राशिनकर,गीता पाटील, संकेत बनसोडे, गजानन घोंगडे,आकाश लोहार,अमित भालके यांनी उपस्थित राहून यशस्वी विद्यार्थ्यांच कौतुक केले.

टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क → Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६